CMYK

●बीड(महाराष्ट्र) ●वर्ष ४ थे ●अंक १४५ ● मंगळवार, दि. ०३ सप्टेंबर २०२४ ●RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/164/RNP/Beed/2022-24 ●पान १ ●पाने ४ ●किंमत ३ रूपये

●Beed (Maharashtra) ●Year4 ●Issue145 ●Tuesday, 03 September 2024 ●RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/164/RNP/Beed/2022-24 ●Page1 ●Pages4 ●Price3Rs.

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर!! विश्वासाची परंपरा!!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी. रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड.
संपर्क : ०२३०३७७, मो. ८४३२७७१७७७
शाखा : माळीवेस, बीड
संपर्क : ०२२०३७७, मो. ९४०५०७२७७७

# दैनिक मराठवाडा पत्र

महाराष्ट्राचा बुलंद आवाज
। बीड । परभणी । छत्रपती संभाजीनगर । जालना । लातूर । धाराशिव । हिंगोली । नांदेड । नगर
■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■

आपल्या बजेटमध्ये
ऑफर 10000 खरेदीवर १५% डिस्काऊंट
आदित्य फर्निचर मॉल
© 7038389999
आजच बुक करा... आपल्या स्वप्नातील बेड...
सोमेश्वर मंदिरासमोर, बार्शी रोड, बीड

बीड ● dailymarathwadapatra2021@gmail.com ● https://marathwadapatra.com ● https://epaper.marathwadapatra.com Mo. 9822152955

## ◆ थोडक्यात...



*अखील भारतीय काँग्रेस कमिटीच्या राष्ट्रीय सचिवपदी व पंजाब राज्याचे सहप्रभारीपदी नियुक्ती बद्दल मा. रवींद्र दळवी यांचा सत्कार करतांना अ‍ॅड.गणेश करांडे, डॉ.जयप्रकाश अघाव, अक्षय यादव, अ‍ॅड.संतोष नागरगोजे, कृष्णा घोलप ईत्यादी*

### सततच्या पावसामुळे नागरीकांनी काळजी घ्यावी तर शेतीपिकांचे पंचनामे करण्याचे : जिल्हाधिकाऱ्यांच्या आवाहन

**बीड । प्रतिनिधी**

सततच्या पावसामुळे नागरीकांनी काळजी घ्यावी तर झालेल्या शेती पिकांचे पंचनामे प्रशासनातर्फे तातडीने व्हावे, असे आवाहन जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी प्रसिद्धी पत्रकाव्दारे केले आहे. जिल्ह्यात यावर्षी आतापर्यंत वार्षिक सरासरीच्या ११५.८ टक्के इतका पाऊस झालेला आहे. दि. २ सप्टेंबर २०२४ रोजी सकाळी ८ वा. जिल्ह्यात ९२ मिलीमिटर इतका पाऊस झाला आहे. तसेच एकूण ६२ महसूल मंडळात अतिवृष्टीची नोंद झाली असून त्यापैकी ३५ महसुली मंडळामध्ये १०० मिलीमिटर पेक्षा जास्त पावसाची नोंद झाली आहे. बीड जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात पाऊस पडत आहे. या पावसामुळे जिल्ह्यातील अनेक नदी नाल्यांना पूर आलेले आहेत. कोसळणाऱ्या या पावसामुळे आणि नदी नाल्यांना आलेल्या पुरापासून नागरिकांनी दक्षता बाळगावी. पूर नियंत्रण रेषेत राहणाऱ्या नागरिकांनी तात्काळ सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करावे, कुठल्याही प्रकारची जीवित वा वित्त हानी होणार नाही याची दक्षता घ्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी श्री. पाठक यांनी केले आहे.

### शेतकऱ्यांनी पीक नुकसानीच्या तक्रारी क्रॉप इंन्शुरन्स ॲप वर तात्काळ नोंदवाव्यात : प्रा.मुंडे

**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

मागील तीन दिवसापासून राज्यासह बीड जिल्हयात



संततधार पाऊस झाल्याने शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेली पीके अतिवृष्टीने गेलेली आहेत. या नुकसानीचे पंचनामे महसूल यंत्रणेमार्फत होतीलच परंतू पीक वीमा कंपनीच्या अटी नुसार चोवीस तासांच्या आत या नुकसानीची तक्रार फोटोसह क्रॉप इंन्शुरन्स प वर करणे आवश्यक आहे. तरी सर्व शेतकरी बांधवांनी आपल्या तक्रारी सदरील ॲप वर नोंदवाव्यात असे अवाहन राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे सेवा निवृत्त अधिकारी कर्मचारी सेल चे राज्य प्रमुख प्रा.ईश्वर आनंदराव मुंडे यांनी केले आहे. या बाबतच्या अडचणी व अधीक माहीतीसाठी ९०९६६८८३६५ या क्रमांकावर संपर्क साधावा.

### राज्यातील 'आयटीआय' मध्ये आत्म संरक्षणाचा वर्ग भरणार, राज्यातील महिलांसाठी 'हर घर दुर्गा अभियान'

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील प्रत्येक शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये (आयटीआय) 'हर घर दुर्गा अभियान' राबविण्यात येणार आहे. या अभियानाच्या माध्यमातून विद्यार्थिनींना वर्षभर आत्मसंरक्षणाचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. शाळा आणि महाविद्यालयांमध्ये शारीरिक शिक्षणाच्या खास तासिकेप्रमाणेच मुलींसाठी आत्म संरक्षण प्रशिक्षणासाठी राखीव तासिका असावी, यासाठी राज्याचे कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी पुढाकार घेतला होता. शारीरिक शिक्षणाप्रमाणेच वर्षभर महिलांसाठी कराटे, जुडो यांसारख्या स्वसंरक्षणाच्या पायाभूत प्रशिक्षणाच्या आठवड्यातून कमीत कमी २ तासिका घेण्यात येणार आहेत. त्याद्वारे आपत्कालीन आणि आव्हानात्मक परिस्थितीत सक्षमपणे लढण्याची ताकद महिलांना देण्यात येणार आहे. हे प्रशिक्षण देण्यासाठी स्थानिक स्वयंसेवी संस्थांचे सहकार्य घेण्यात येणार असून, विद्यार्थिनींना नियमित सरावासाठी उद्युक्त करण्यात येणार आहे.



*बैलपोळा सणाच्या निमित्ताने माजीमंत्री सुरेश धस यांनी सपत्नीक बैलांची विधिवत पूजा करत त्यांना पुरणपोळीचा नैवेद्य भरवत बळीराजाला पौळ्याच्या शुभेच्छा दिल्या..*

# 'क्षीर' सागरात मुस्लिमांच्या वस्त्या पोहणी

# नीताताई अंधार झाला, कुठला बदला घेत आहात ?







**बीड । प्रतिनिधी**

बीड अर्धे शहर पोहणी लागले आहे, रस्ते जलमय घरात अंधार आहे, नाल्या थेट बेडच्या पायथ्याला लागल्या आहेत. गांधी नगर भागात साप पाण्यात दिसत आहेत अशा वेळी शासन ना प्रशासन लक्ष देत नाही. क्षीर म्हणजे अगदी जमून बसलेल्या सागरात मुस्लिम वस्त्या पोहणी लागल्या आहेत. नप च्या सीईवो नीता अंधारे पाहते म्हणतात मात्र त्या डूकुन पाहत नसल्याचे लोक बोलत आहेत. परतीच्या पावसाकडे वाटचाल असताना बीड जिल्ह्यात सर्व मंडळ मध्ये अतिवृष्टी असल्याने शेती व रहिवास पाणिमय झालेला आहे. बीड शहरातील बहुतांशी भागात पावसाचे पानी साचले आहे. नगर पालिकेचे कर्मचारी कुठे दिसत नाहीत. साचलेल्या पाण्याने आरोग्याचे प्रश्न वाढणार असून याकडे जिल्हा प्रशासन देखील लक्ष द्यायला तयार नाहीत. तेलगाव नाका परिसरात प्रचंड मोठी हानी झालेली आहे मात्र नगर पालिका प्रशासन लक्ष द्यायला तयार नाही असे लोक बोलत आहेत.

#### ▸ बुधवारी रस्ता जाम

**भागवत तावरे, संचालक धनंजय गुंदेकर सह लोकपत्रकार मित्र परिवार कडून तेलगाव नाका येथे चक्का जाम आंदोलन करणार असल्याचे प्रशासनालाकळवलेआहे.**



#### ▸ लोकपत्रकार दोन दिवस पाण्यात



**भागवत तावरे यांनी गांधी नगर, तेलगाव नाका, शिवाजीराव धांडे नगर भागात भेटी दिल्या. गांधी नगर भागातील नागरिकानी भागवत तावरे यांना आपली कैफियत सांगितली. भागवत तावरे रात्री उशिरा पर्यन्त पावसात लोकात भेटी घेताना दिसून आले. त्यांनी सोशल मिडियात यावर खंत व्यक्त करताना नगर पालिका प्रशासन व नेत्याना धारेवर धरले. भागवत तावरे नेहमीच या प्रश्नावर बोलले आहेत मात्र नगर पालिकेने लक्ष दिले नाही. बीड परळी रोड च्या बाजूच्या नाल्यात पानी पास न केल्याने तेच पानी मूनवरा मसजिद भागात घरात घुसले आहे.**

#### ▸ क्षीरसागर बंधु नदीच्या अलीकडे आलेच नाहीत

**नगर पालिका अनेक वर्षे ज्या कुटुंबाकडे होती त्या कुटुंब वारसदार बिंदुसराच्या अलीकडे आले नाही जुना पूल पाहून आणि टीव्हीला बाईट देऊन गेल्याचे लोक बोलत आहेत.**

#### ▸ खासदार बोलले

**जिल्ह्यातील सर्व प्रश्नावर काम करणारे खा बजरंग सोनवणे यांनी नगर पालिका बीड चे कान टोचले या सोबतच जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे पंचनामे तात्काळ करा अशा सूचना दिल्या.**

## अतिवृष्टीच्या अनुषंगाने आ.संदीप क्षीरसागरांच्या प्रशासनाला सूचना

**जिल्हाधिकारी, रस्ते विकास महामंडळ, नगरपरिषद मुख्याधिकाऱ्यांकडे केला पत्रव्यवहार**

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यात सध्या सर्वत्र पाऊस सुरु असून सर्व ठिकाणी अतिवृष्टीची नोंद झाली आहे. गेल्या तीन ते चार दिवसांपासून बीड जिल्ह्यात पावसाची संततधार सुरु आहे. त्यामुळे जनजीवन विस्कळीत झाले असून अनेक अडचणी निर्माण झाले आहेत. तसेच या अनुषंगाने काळजी घेण्याची गरज असल्याने आ.संदीप क्षीरसागर यांनी प्रशासनाला सूचना दिल्या असून याबाबत जिल्हाधिकारी, महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळाचे कार्यकारी अभियंता व बीड नगरपालिकेचे मुख्याधिकारी यांच्याकडे पत्रव्यवहार केला आहे.

बीड तालुक्यातील कपिलधारवाडी येथे भूस्खलनाचा होण्याचा धोका आहे. सदरील गावात ८० ते ८५ कुटुंबे असून

.... (उर्वरित पान २ वर)

#### सर्व पिकांची सरसकट नुकसान भरपाई द्या



**बीड विधानसभा मतदारसंघ क्षेत्रासह जिल्ह्यातील सर्वच महसूल मंडळात अतिवृष्टीची नोंद झाली आहे. सलग तीन–चार दिवस पावसाची संततधार असल्याने शेतातील सर्वच पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. सातत्याच्या आस्मानी संकटाने शेतकरी घाईला आला आहे. त्यामुळे जिल्हा प्रशासनाने तात्काळ पंचनामे करून सर्व पिकांना सरसकट नुकसान भरपाई मिळण्याकरिता प्रशासकीय स्तरावर कार्यवाही करावी अशी मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी केली आहे.**

## मराठवाड्यात पावसाचा कहर; तीन ठार, 80 जनावरे वाहून गेली तर 135 घरांची पडझड



**छ.संभाजीनगर । प्रतिनिधी**

मराठवाड्यातील ४२० महसूल मंडळपैकी २८४ महसूल मंडळात अतिवृष्टी झाल्याने शेतामध्ये पाणी साठले आहे. नदी नाल्यांना पूर आले असून लातूर जिल्ह्यात ढोरसावंगी येथे नरेश अशोक पाटील या तरुणाचा वाहून गेल्याने मृत्यू झाला. तर बीड व हिंगोलीमध्येही जिल्ह्यातही वाहून गेल्याने दोन जणांचा मृत्यू झाला. पुराच्या पाण्यात रविवारी रात्रीपासून छोटी – मोठी ८० जनावरे वाहून गेल्याने दगावली आहेत. २१ पक्की घरे तर ११६ कच्च्या घरांची पडझड झाली असून परभणी, हिंगोली, नांदेड, बीड जिल्ह्यातील अनेक गावात पाणी शिरले असल्याचे वृत्त आहे. गोदावरी नदीतून जायकवाडी धरणात येणाऱ्या पाणी पातळीत वाढ झाल्याने कोणत्याही क्षणी जायकवाडीतून पाणी सोडले जाऊ शकते. त्यामुळे नदी काठच्या १०० गावांना सतर्क राहण्याचा इशारा दिला आहे.

रविवारी रात्रीपासून पावसाची जोरधार कायम आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील ४७ महसूल मंडळात अतिवृष्टी नोंदण्यात आली. त्यामुळे वहिरी काठोकाठ भरल्या आहेत. नदी नाल्यांना पूर आले आहेत. अजिंठा– वेरुळ लेणींवरील धबधबे पुन्हा जोरधारेसह कोसळू लागले आहेत. सिल्लोड, फुलंब्री भागातील विहिरींमध्ये तुडुंब भरल्या आहेत. अनेक भागात शिवारात पाणी साठल्याने शेती पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. पैठण तालुक्यातील नांदर महसूल मंडळात १४९ मिलीमीटर पाऊस नोंदण्यात आला. तर पाचोड परिसरात १९० मिलीमीटर पाऊस नोंदण्यात आला. यामुळे

... (उर्वरित पान २ वर)

## ज्ञानराधा मल्टिस्टेटच्या २ हजार ठेवीदारांनी नोंदवले जबाब

**घोटाळा जिल्ह्यातील ठेवीदारांची आर्थिक गुन्हे शाखेत जबाब नोंदवण्यासाठी दररोज होतेय गर्दी**

**बीड । प्रतिनिधी**

ज्ञानराधा मल्टिस्टेट पतसंस्था प्रकरणात आतापर्यंत २ हजार ठेवीदारांनी आर्थिक गुन्हे शाखेकडे जबाब नोंदवून आपल्या ठेवींची माहिती दिली आहे. पोलिसांनी पुण्यातून अटक केलेला पतसंस्थेचा उपाध्यक्ष यशवंत कुलकर्णी व मुलगा वैभव कुलकर्णी यांना रविवारी बीड न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने दोघांना ५ सप्टेंबरपर्यंत पोलिस कोठडी सुनावली.

बीड येथील कुटे उद्योग समूहावर नोव्हेंबर २०२३ मध्ये प्राप्तीकर विभागाने छापेमारी केली होती. यानंतर सुरेश कुटे अध्यक्ष असलेल्या ज्ञानराधा मल्टिस्टेट

... (उर्वरित पान २ वर)

**५ हजार कोटी रुपयांच्या मालमत्ता केल्या जप्त आर्थिक गुन्हे शाखेने सुरेश व अर्चना कुटे यांच्या २३८ मालमत्ताशोधल्या आहेत. यापैकी सुरेश कुटेव आशिष पाटोदकर यांच्या मालकीच्यासुमारे ५ हजार कोटींच्या मालमत्ता जप्त करण्यात आल्या आहेत. आणखी मालमत्ता जप्त करणे बाकी असून १० हजार कोटींच्या मालमत्ता असण्याची शक्यता आहे. मात्र या मालमत्तांवर इतर बँकांचे कर्जही असल्याची माहिती सूत्रांनी दिली.**

## योजनेतील तांत्रिक दोष दुर करुन केजमधील लाडक्या वहिणींना मिळाणार लाभ

**जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी तहसीलदारांसोबत घेतली बैठक**

**बीड । प्रतिनिधी**



राज्याचे संवेदनशील मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सुरू केलेल्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेला राज्यभरात भरभरुन प्रतिसाद मिळत आहे. योजनेचे दोन हप्ते राज्यासह जिल्ह्यातील लाडक्या बहिणींच्या खात्यावर जमा झाले आहेत. मात्र केज तालुक्यातील महिलांचे फार्म काही तांत्रिक दोषामुळे योजनेचे पेंडींग राहिले होते. याची माहिती मिळताच शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी केज तहसीलदारांशी संपर्क साधून आढावा बैठक घेतली. बैठकीत

...(उर्वरित पान २ वर)

## कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी साजरा केला बैलपोळा

**परळी वैद्यनाथ । प्रतिनिधी**



महाराष्ट्र राज्याचे कृषिमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी आपले जन्मगाव नाथरा ता. परळी वै. येथे आज बैलपोळ्या निमित्त उपस्थित राहून आपल्या शेतातील बैल जोड्यांचे कुटुंबीयांसमवेत पारंपरिक पद्धतीने पूजन केले व बळीराजाचा जोडीदार असलेल्या बैल जोड्यांना पुरणपोळीचा नैवेद्य भरवला.

बैलपोळ्याच्या निमित्ताने मराठवाड्यात बैलांची पूजा करताना पाऊस आल्याची चाहूल लागल्याचे एक खास गीत म्हटले जाते, चाहुर चाहुर चांग भलं, पाऊस आला घरला चला अशा आशयाचे हे ग्रामीण गीत बैलजोड्यांचे पूजन करताना स्वतः धनंजय मुंडे सुद्धा हे म्हणताना पाहायला मिळाले!

देशाच्या समृद्ध कृषी परंपरेमध्ये बळीराजाच्या सोबतीने किंबहुना बळीराजाच्या बरोबरीने कष्ट उपसणाऱ्या बैलांच्या प्रति कृतज्ञता व्यक्त करण्याचा बैलपोळा हा सण असून या निमित्ताने राज्यातील समस्त शेतकरी बांधवांना आपण शुभेच्छा देतो, असे धनंजय मुंडे यांनी म्हटले आहे. या प्रसंगी धनंजय मुंडे यांच्या मातोश्री रुक्मिणीबाई मुंडे, बंधू अजय मुंडे व अभय मुंडे यांसह आदी उपस्थित होते.

#### ▸ नुकसानीचा घेतला आढावा

**दरम्यान ग्रामीण भागात बैलपोळ्याचा सण उत्साहात साजरा केला जात असताना आपली पारंपारिक प्रथा जपत कृषी मंत्री धनंजय मुंडे यांनी आजच कृषी विभागाच्या दोन बैठकांनाही ऑनलाईन मार्गदर्शन केले. याशिवाय मागील दोन–तीन दिवसापासून बीड जिल्ह्यासह राज्यात मराठवाड्यातील अनेक जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे, त्या नुकसानीचाही ऑनलाइन बैठकीत अधिकाऱ्यांकडून आढावा घेतला, तसेच आवश्यक त्या ठिकाणी पावसाचा जोर कमी झाल्यानंतर पंचनामे करण्याचे आदेशही त्यांनी दिले आहेत. त्याचबरोबर मनुष्यहानी, पशुहानी होणार नाही, या पद्धतीने आपत्ती व्यवस्थापन करण्याच्या सूचनाही संबंधित यंत्रणाना दिल्या आहेत.**

CMYK

## ◆ संपादकीय...

# वाचनाने मुलांच्या प्रगतीला मिळते गति मुलांच्या जगात पुस्तकांचे महत्त्व !



लहान वयात मुलं ज्या गोष्टी पाहतात, अनुभवतात, त्या गोष्टींची सवय मुलांना लागते. अगदी लहान मुलांना म्हणजे सहा - सात महिन्यांच्या बाळाला सुद्धा पुस्तकातलं चित्रं दाखवून गोष्टी सांगितली, तर त्यांना आवडतं. लहान वयात मुलांना पुस्तरकांचं महत्त्व कळलं, तर त्याचा फायदा त्यांना आयुष्यभरासाठी होतो. डिजीटल युगात कोणत्याही प्रकारची माहिती एका क्लिकवर सहज उपलब्ध होते. त्यामुळे पुस्तक वाचून काय मिळणार ? असा प्रश्न पडतो. पुस्तकातून फक्त माहिती नाही, तर ज्ञान मिळतं. त्याचबरोबर वाचन करणारी व्यक्ती अनुभव समृद्ध असते. लहान वयापासून मुलांना वाचनाची सवय असल्यास त्यांची कल्पनाशक्ती वाढते, संवाद कौशल्य विकसीत होतं, विविध विषयांची माहिती मुलांना मिळते. मुलांसोबत क्वॉलिटी टाइम स्पेंड करण्यासाठी पुस्तक वाचन हा उत्तम पर्याय आहे. यामुळे अगदी बाळांपासून ते ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वांच्या आयुष्यात पुस्तकांचे महत्त्व आहे.

लहान मुलं पुस्तकं फाडून टाकतात, अशी तक्रार अनेक पालक करतात. पण, लहान वयातच मुलांना पुस्तकांची ओळख करून दिल्यास, मुलं पुस्तकं फाडण्याचं प्रमाण नक्कीच कमी होतं. अनेक मुलांना संवाद साधणं शिकवावं लागतं. याला अनेक कारणं आहेत. विभक्त कुटुंब, एकच मुलं, मोबाईल किंवा गॅझेटचा अति वापर, शब्द माहित नसणे. पण, जी मुलं पुस्तकं वाचतात, हाताळतात, त्यांची भाषा विकसित होते. पुस्तक वाचन म्हणजे एक प्रकारे हा संवाद आहे. यामुळे मुलांमध्ये संवाद कौशल्य लहान वयापासून विकसित होते. आजच्या काळात संवाद साधता येणं हा एक प्रकारे तुमचा युएसपी आहे. पुस्तकातील वैविध्यपूर्ण शब्द, वाक्यरचना लहानपणीच मुलांच्या कानी पडल्याने, लहान वयापासून त्या शब्दांचा वापर ते सहजरित्या करतात. लहान मुलांसाठी मराठी मॅगझीन, गोष्टींची पुस्तकं, लहान कार्डबोर्डची फक्त चित्रांची पुस्तकं असतात. या पुस्तकांच्या सहाय्याने मुलांना वाचनाची गोडी लावता येऊ शकते.

मुलांना लहान वयातचं व्हिडीओ रूपात गोष्टी दाखवल्या तर तेच चित्र त्यांच्या मेमरीमध्ये फीड होतं. त्यामुळे मुलं स्वतःहून विचार करत नाहीत. पण, गोष्ट ऐकताना त्यांच्या कानावर शब्द पडतात आणि मुलांच्या विचारांना चालना मिळते. मुलं स्वतःच्या कल्पना विश्वात रमतात. यातूनच त्यांना नवीन कल्पना सुचतात. मुलं स्वतः खेळ तयार करून खेळतात. मुलं जेव्हा मोबाईल अथवा टीव्ही पाहतात. तेव्हा त्यांच्या डोळ्यावर ताण येतो. ते एकाच जागी खिळून बसतात. याचे परिणाम मुलांच्या आरोग्यावर दिसून येतात. पुस्तक वाचन करताना मुलांचे मनोरंजन होते. पुस्तक वाचनाची आवड असल्यास मुलांना बोअर झाल्यावर पुस्तक वाचन हा चांगला विरंगुळा असतो. पुस्तक वाचनामुळे बुद्धीला खाद्य मिळते. यामुळे मुलं वेगळ्या प्रकारे विचार करायला शिकतात. वाचनामुळे मुलांना रिलॅक्स वाटते. रात्री झोपायच्या आधी वाचन केल्यास चांगली झोप लागते. मुलं ही बघून अनेक गोष्टी शिकत असतात. पुस्तक वाचनातून मुलांना अनेक गोष्टींची ओळख होते. यातूनच नवीन चांगली मूल्य मुलं सहजरित्या आत्मसात करू शकतात. गोष्ट सांगताना, त्याचा बोध न सांगता फक्त त्या गोष्टीतल्या पात्रांच्या वर्तन, संवादातून हे संस्कार मुलांवर होतात. मुलं विचार करायला शिकतात, वाचन लवकर जमते, याचा फायदा मुलांना शैक्षणिक प्रगतीमध्ये होतो. कारण, मुलांकडे शब्दसंपदा चांगली असते. आकलन शक्ती चांगली असते. त्याचबरोबर पुस्तक वाचनामुळे लक्ष केंद्रित करू शकतात. या सर्व गोष्टींचा एकत्रित फायदा मुलांना अभ्यास करताना होतो. आधीपासून वाचन करत असल्यामुळे अभ्यासाची पुस्तकही आवडीने वाचली जातात. पुस्तक वाचनाच्या सवयीमुळे मुलांमध्ये एक वेगळा दृष्टिकोन तयार होतो. यामुळे संकटांचा सामना कसा करावा, संयमाने कसे वागावे, कठीण परिस्थितीत मार्ग कसा काढावा असे वेगळे विचार मुलं लहान वयापासून करायला शिकतात. यामुळे निगेटिव्ह विचार, डिप्रेशन अशा गोष्टींपासून मुलं लांब राहू शकतात. पुस्तक हा आपला मित्र आहे. यामुळे मुलं कधीच एकटी पडतं नाहीत. त्यांना नेहमी पुस्तकांची साथ असते. मुलांच्या वयानुसार पुस्तकांची निवड केली पाहिजे. सहा महिने ते तीन वर्षांपर्यंतच्या मुलांसाठी मोठी रंगीत चित्रांची पुस्तके या मुलांना आवडतात. पुस्तकांचा आकार छोटा असल्यास त्यांच्या हातात मावतात. लहान मुलांना संख्या, अक्षरे, आकार, रंग, प्राणी, पक्षी, प्राणी अशा अनेक गोष्टींचा परिचय मनोरंजकरित्या करून देता येतो. गोष्टीच्या पुस्तकांमध्ये टेक्स कमी आणि जास्त चित्र असणारी पुस्तक निवडल्यास मुलांना ती पुस्तक आवडतात. लहान मुलांना पौराणिक कथादेखील आवडतात. मोठ्या मुलांसाठी फिक्शन, चरित्र, प्रवास वर्णन, वैज्ञानिक, ऐतिहासिक अशा विविध पुस्तकांचा परिचय करून देऊ शकतो. यातून मुलांच्या आवडीप्रमाणे मुलं पुढे जाऊन पुस्तकांची निवड करू शकतात. मुलांच्या वाढीत पुस्तकांचे महत्त्व आहे.

पालक मुलांना प्रत्यक्ष प्रत्येक गोष्टीचा अनुभव देऊ शकत नाहीत. अशावेळी पुस्तक रूपाने मुलांना हे अनुभव देता येतात. मुलांचे ज्ञानही यामुळे वाढते. अनेकदा मुलांना वेगळ्या संस्कृतींचा परिचय या पुस्तकातून होतो. यामुळे मुलांचे व्यक्तिमत्व घडत असताना याचा नक्कीच फायदा मुलांना होतो. एखादी चांगली सवय अचानक लागत नाही. त्यासाठी मेहनत ही घ्यावीच लागते. मुलांना वाचनाची चांगली सवय लागण्यासाठी पालकांनी मेहनत घेणे आवश्यक आहे. लहान वयापासून मुलांना झोपण्याआधी पुस्तकं वाचून दाखवू शकतो. त्याबरोबरीने ॲक्टिव्हीटी बुक असतात. बाहेर जाताना अशी पुस्तकं बरोबर नेऊ शकतो. लहान पुस्तक मुलांना वाचण्यासाठी प्रोत्साहन देऊ शकतो. लहान मुलांना एखादी गोष्ट खूप आवडते. त्यामुळे रात्रंदिवस त्यांना तिच गोष्ट ऐकायची असते. सतत तिचं गोष्ट वाचून दाखवणे, पालकांसाठी कंटाळवाणे असू शकते. पण, यावेळी पालकांनी थोडा संयम ठेवून त्यांना गोष्ट वाचून दाखवावी. मुलांच्या आवडीचा किंवा भावनांचा जवळचा संबंध असतो. यावेळी मुलांना अन्य गोष्टींची देखील ओळख करून देत रहावी. मुलांना घडवण्यासाठी पालक अनेक पद्धतींचा अवलंब करत असतात. यामध्ये पुस्तक वाचन हा एक चांगला मार्ग आहे. मुलांच्या बौद्धिक, सामाजिक, भावनिक, शैक्षणिक विकासामध्ये पुस्तकांचा सिंहाचावाटाअसतो.

# समाजाला योग्य दिशा देणारं वैचारिक संघटन : मराठा सेवा संघ

मराठा सेवा संघाची स्थापना १ सप्टेंबर १९९० रोजी अकोला येथे ड.पुरुषोत्तम खेडेकर व निर्मलकुमार देशमुख यांनी केली. सोबत आणि १७ सदस्य होते. त्यानंतर टप्प्याटप्प्याने विविध कक्षाची स्थापना करण्यात आली. संपूर्ण देशात,राज्यात मराठा सेवा संघाचा प्रसार झालेला आहे. जिजाऊ सृष्टी सिंदखेड राजा, बळीराजा संशोधन केंद्र नागपूर, यासह विविध प्रकल्पांचे काम सुरू आहे. मराठा सेवा संघाची व विविध कक्षाची अनेक अधिवेशने, शिवधर्म परिषदा, शिवसन्मान जागर परिषदा, शिवशाहू यात्रा, एक वैचारिक प्रबोधनाचा विचार यातून पेरला गेला. सुरुवातीलाच बहुजन समाजाला पंचसत्ता सांगितल्या, शिक्षणसत्ता, अर्थसत्ता, धर्मसत्ता, राजसत्ता, प्रचार-प्रसार माध्यमसत्ता, या सर्व आजच्या महासत्ता आहेत. हे सांगण्याचं काम केलं. शिक्षण ही सर्वोच्च सत्ता आहे. शिक्षण म्हणजे केवळ पदव्या प्राप्त करून स्वतःची व आपल्या कुटुंबाची सोय करणे नाही तर नॉलेज इज पावर, आशिक्षिताने शिक्षित होणे, शिक्षिताने सुशिक्षित होणे, सुक्षक्षिताने सर्जनशील होणे आणि सर्व समाजासाठी योगदान देणे. आजच्या काळात प्रत्येक बहुजन व्यक्ती सर्वक्षेत्रात निपुण झाले पाहिजे, प्रत्येकाच्या घरात ग्रंथालय असले पाहिजे, प्रत्येक व्यक्ती बहुभाषिक असले पाहिजे, इंजिनिअर, वकील, डॉक्टर या पलीकडे अनेक ज्ञानशाखा आहेत. विषय आहेत. लोक काय म्हणतील याची काळजी न करता प्रत्येकाने आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी असले पाहिजे. नोकरी करण्यापेक्षा नोकरी देणारे झाले पाहिजे. त्याचबरोबर मराठा सेवा संघाने अर्थसत्ता रक्तासारखी गरजेची मानली आहे. त्यासाठी अनेक बँका व पतसंस्था उभारल्या आहेत. मराठा युवकांनी आर्थिक स्वावलंबनासाठी बूट पोलीस ते तेल मालिश करावे, कुठलीही लाज बाळगू नये, कोणताही व्यवसाय लहान नसतो, आईवडिलांनी मुलांच्या पाठीमागे ताकदिने उभे राहावे, धर्मसत्ता आपले जन्मापूर्वीचे ते मृत्यूनंतरचे जीवन व संस्कार प्रभावित करते. परंतु हिंदू धर्मात अनेक खोट्या बाबी घुसडल्या आहेत. त्या विरोधात चार्वाक, जैन, बुद्ध, लिंगायत, महानुभाव, वारकरी, जिजाऊ, शिवराय, शंभूराजे, फुले,शाहू,सयाजीराव गायकवाड असे समाजसुधारक लढले. मराठा सेवा संघाने शिवधर्म पर्याय दिला. जिजाऊ हे प्रेरणास्थान माणले.जय जिजाऊ हे अभिवादन दिले. महिलेस सर्वोच्च स्थान देणारा शिवधर्म जगात एकमेव धर्म आहे. आपले विधी संस्कार पूजा-पाठ कर्मकांड कोणत्याही इतर मध्यस्थाशिवाय आपण करणे हाच शिवधर्म आहे. त्याचबरोबर राजसत्ता व मानव यांचा प्राणवायू एवढा जवळचा संबंध आहे. संभाजी ब्रिगेड राजसत्ता मिळवण्याच्या प्रयत्नात आहे.

मराठा सेवा संघाच्या प्रबोधनामुळे मराठा व दलित व इतर बहुजन जातीतील संघर्ष थांबला असून ते वेगळा विचार करीत आहेत. केवळ महाराष्ट्रातच नाही तर संपूर्ण भारतातील समाज बांधवांना जोडण्याचे कार्य मराठा सेवा संघ करीत आहे. राज्याबाहेरील कुणबी व तत्सम शेतकरी जातीची समन्वय ठेवून कार्य सुरू आहे. हरियाणा येथील पानिपतच्या युद्धात परागंदा झालेल्या आठ लाख मराठा बांधवांची पुनर्भेट व चळवळीत सहभाग हा मोठा सांस्कृतिक विषय आहे. मराठा कुणबी, कुटुंबी, कुडमी, कुर्मी, कल्लर, नायर, रेड्डी, राजपूत आदी नावाने कार्यरत समाज संस्था व संघटना एकत्र येत आहेत. या सर्वांना एकत्र करून संपूर्ण बहुजन समाज जोडण्याचे कार्य मराठा सेवा संघ करीत आहे. मराठा सेवा संघाची स्थापना झाल्यावर जातीवादाचा आरोप करण्यात आला होता. परंतु मराठा सेवा संघाने सातत्याने वैचारिक भूमिका घेतली असून जाती पलीकडे जाणारी संघटना म्हणून मराठा सेवा संघाची ओळख निर्माण झाली आहे. जातीय व धार्मिक दंगलीमुळे देशाचे फार मोठे नुकसान झाले होते. ब्राह्मण सोडून उर्वरित या दंगलीचे बळी ठरलेले आहेत. हिंदू मुसलमान दंगली घडवून त्यात मराठा तरुणाचा खूप मोठा गैरवापर करण्यात आला होता.अनेक आंदोलने पेटवून त्यात हजारो बहुजन मारले गेले. देशातील वातावरण सातत्याने अशांत ठेवण्याचा प्रयत्न केला गेला होता. राज्यामध्ये मराठा विरुद्ध दलित असा संघर्ष पेटवला जात होता.या संघर्षात बहुजनांचे प्रचंड नुकसान झाले. या सर्व बाबींचा मराठा सेवा संघाने नीट अभ्यास केला. प्रबोधन केले. दंगल घडवून आणणारे मेंदू शोधले. त्यांची कारणे शोधली. **(क्रमशः)**

**-डॉ.शिवानंदभानुसे, प्रदेशप्रवक्ते, संभाजीब्रिगेड, महाराष्ट्र**

◆ पान १ वरून पुढे...

## अतिवृष्टीच्या अनुषंगाने...

५०० ते ६०० लोक सध्या त्याठिकाणी वास्तव्यास आहेत. या गावाची रचना, वरच्या बाजूला डोंगर व खालच्या बाजूला नदी आणि मधोमध गाव अशाप्रकारची आहे. त्यामुळे तेथे भूस्खलन होण्याचा धोका सातत्याने जाणवत आहे. या गावातील लोकांचे संरक्षण होण्याच्या दृष्टीने या गावाचे पुनवर्सन करण्याची मागणी गेल्या अनेक दिवसांपासून आहे. तसेच याबाबतचा प्रस्तावही गेल्या अनेक वर्षांपासून शासनस्तरावर प्रलंबित आहे. दरम्यान सद्यस्थितीला गावातील कुटुंबे व नागरिकांचे सरंक्षण व्हावे यासाठी नदीच्या कडेला व डोंगरी भागात संरक्षण भिंत बांधणे, डोंगरी भागात लोखंडी जाळी मोठया प्रमाणात बसवावी यासोबतच येथील सुरक्षेसाठी तांत्रिकदृष्ट्या आवश्यक असलेल्या सर्व बाबी त्याठिकाणी राबविण्यात याव्यात यासोबतच बीड जिल्ह्यात अशाप्रकारचा धोका असलेल्या ठिकाणी उपाययोजना कराव्यात याकरिता जिल्हाधिकारी यांच्याकडे आ.संदीप क्षीरसागर यांनी मागणी केली आहे. तसेच बीड शहरात मागील दोन दिवसांच्या अतिवृष्टीने शहरात अनेक अडचणी निर्माण झाल्या आहेत. बीड शहरानजीक असलेल्या बिंदुसरा धरण पूर्ण क्षमतेने भरून वाहत असल्याने बीड शहरातील नदीकाठच्या नागरिकांना, व्यापाऱ्यांना नगरपालिकेच्या वतीने सतर्कतेचा इशारा देण्यात येत आहे. परंतु याबाबत काळजी घेणे देखील महत्वाचे आहे. शहरातील अनेक भागांमध्ये स्वच्छतेअभावी नागरिकांच्या राहत्या घरामध्ये पाणी शिरले आहे. त्यामुळे नागरिकांची मोठी गैरसोय होत असून दैनंदिन जीवन, आरोग्य तसेच इतर प्रकारच्या समस्या निर्माण होत आहेत. याबाबत नगरपालिकेच्या वतीने नाली स्वच्छता करून नागरिकांना रस्ते व सोयीसुविधा देण्यासाठी यंत्रणेला आदेशित करा अशा सूचना आ.क्षीरसागर यांनी बीड नगरपालिकेचे मुख्याधिकारी यांना दिल्या आहेत. तसेच मांजरसुम्बा-लिंबागणेश-पाटोदा रस्त्याचे काम काही दिवसांपूर्वी पूर्ण झाले आहे. हा रस्ता मोरगाव ग्रामपंचायत अंतर्गत असलेल्या जाधव-वस्ती याठिकाणाहून जातो परंतु याठिकाणी रस्त्याच्या दोन्ही बाजूला नालीचे बांधकाम होऊन पावसाच्या पाण्याची विल्हेवाट लावणे गरजेचे असताना याठिकाणी अशी कोणतेही काम झाले त्यामुळे सध्या सदरील ठिकाणी वास्तव्यास असलेल्या शेतकऱ्यांच्या घरात आणि शेतात पाऊस झाला कि पाणी शिरते. दरम्यान दोन दिवसांपासून सुरु असलेल्या पावसामुळे त्यांच्या शेतात आणि घरात आजदेखील पाणी साचून राहिले असल्याची परिस्थिती आहे. त्यामुळे आ.संदीप क्षीरसागर यांनी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे संभाजीनगर विभागाचे कार्यकारी अभियंता यांच्याकडे पत्रव्यवहार करून तातडीने मांजरसुम्बा-लिंबागणेश-पाटोदा रस्त्यावर जाधव वस्ती येथे उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.

## मराठवाड्यात पावसाचा कहर..

शेतीचे मोठे नुकसान झाले आहे. जायकवाडी धरणातूनही पाणी सोडावे लागेल अशी स्थिती नाही. नगरमध्ये पाऊस आहे. पण नाशिकमधील धरणांमधील पावसाचा जोर कमी झाल्याने जायकवाडीतून पाणी लगेच पाणी सोडावे लागेल अशी स्थिती नाही. मात्र, गोदावरी नदीवरील आपेगाव, हिरडपुरी, राजाटाकळी , मुदगल, लोणी सावंगी यासह विविध उच्च पातळी बंधाऱ्यातून पाण्याचा विसर्ग करण्यात आला आहे. दरम्यान जायकवाडी धरणात आजही २५ ते ३० हजार क्युसेक वेगाने पाणी येत आहे. त्यामुळे धरण ९५ टक्के भरल्यानंतर पाणी सोडायचे, की नाही याबाबतचे निर्णय घेतले जातील, असे अधीक्षक अभियंता एस. के. सब्बीनवार यांनी सांगितले.

## ज्ञानराधा मल्टिस्टेटच्या...

संस्थे ठेवी काढण्यासाठी ठेवीदारांची मोठी गर्दी झाली होती. आठवडाभर ठेवी वाटल्यानंतर पतसंस्थेची आर्थिक स्थिती गडबडली आणि पतसंस्था अडचणीत आली होती. तेव्हापासून सुरेश कुटे केवळ पैसे देण्याचे नियोजन सुरु आहे. परदेशातून आपल्या उद्योग समूहात गुंतवणूक येत आहे. १० हजार कोटींची ही गुंतवणूक असून त्यातून ठेवीदारांच्या ठेवी मिळणार आहेत. असे सांगत होता. ९ महिने ठेवीदारांनी त्याच्या या आश्वासनांवर विश्वास ठेवला. मात्र कुटे ठेवी परत करण्यात सक्षम नसल्याचे लक्षात आल्यानंतर ठेवीदारांनी कुटेसह संचालक मंडळ, कर्मचारी यांच्यावर गुन्हा नोंदीचे सत्र सुरु केले होते. मागील काही महिन्यांत ज्ञानराधा मल्टिस्टेट प्रकरणात बीड जिल्ह्यात ४२ गुन्हे नोंद आहेत. २ महिन्यांपूर्वी आर्थिक गुन्हे शाखेने सुरेश कुटे व संचालक आशिष पाटोदकर यांना पुण्यातून अटक केली होती. दरम्यान, पतसंस्थेचा उपाध्यक्ष यशवंत कुलकर्णी व त्याचा मुलगा वैभव कुलकर्णी हे गुन्हा नोंद झाल्यापासून फरार होते. त्यांना शुक्रवारी मदतीने पुण्यात अटक केली. पुण्यातून त्यांना ताब्यात घेत रविवारी न्यायालयासमोर हजर करण्यात आले. बीड शहर ठाण्यात दाखल गुन्ह्यात त्यांना अटक दाखवले गेले असून न्यायालयाने दोघांना ५ सप्टेंबरपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे.

परळीच्या राजस्थानी मल्टिस्टेट पतसंस्थेच्या फसवणूक प्रकरणातही ६ गुन्हे नोंद आहे. गुन्हेशाखेने उपाध्यक्ष अभिषेक बियाणीला पुण्यातून अटक केली. त्यालाही अंबाजोगाई न्यायालयासमोर हजर केले होते. न्यायालयाने त्यालाही ५ सप्टेंबरपर्यंत पोलिस कोठडी सुनावली.

## योजनेतील तांत्रिक दोष ...

योजनेतील तांत्रिक दोष दुर करुन महिलांना लाभ देण्याबाबत सकारात्मक चर्चा झाली. मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेसाठी केज विधानसभा समिती नियुक्त नाही. मात्र योजनेचा लाभ जिल्ह्यातील प्रत्येक महिलांना मिळण्यासाठी शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांच्यासह शिवसैनिक कायम प्रयत्नशिल असल्याचे दिसून येते.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेचा लाभ मोठ्या प्रमाणात महिलांना मिळाला आहे. काही ठिकाणी योजनेतील तांत्रिक दोष निर्माण झाले. हे दोष दुर करुन योजनेचा लाभ राज्यातील प्रत्येक लाडक्या बहिणींना मिळण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व शिवसैनिक दिवसरात्र प्रयत्नशिल आहेत. दरम्यान केज तालुक्यातील महिलांचे फॉर्म तांत्रिक दोषामुळे पेंडींग होते. या संदर्भात शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी सखोल माहिती घेत केजचे तहसीलदार देशपांडे आणि पंचायत समितीच्या बीडीओ दिवाणे मॅडम यांच्या उपस्थितीत आढावा बैठक घेतली. योजनेमध्ये येत असलेल्या तांत्रिक अडचणींवर बैठकीमध्ये सकारात्मक चर्चा झाली. मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेतील तांत्रिक अडचणी लवकरच दुर करुन केज तालुक्यातील पेंडींग फॉर्म निकाली काढणार असल्याचे तहसीलदार देशपांडे यांनी बैठकीत सांगितले. यावेळी शिवसेनान जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी योजनेचा लाभ महिलांना मिळण्यासाठी शिवसैनिक कायम प्रशासनासोबत असल्याचे सांगितले. बैठकीस जिल्हा संघटक सुनील सुरवसे, तालुकाप्रमुख पंजाब देशमुख, विधानसभा प्रमुख दादासाहेब ससाने, शहर प्रमुख बाळासाहेब पवार, युवासेना तालुकाप्रमुख सुग्रीव सक्राते , डॉ बुडुक, उपतालुकाप्रमुख महेंद्र चाटे, चंद्रकांत इंगळे माझी जि प सदस्य किसन दादा कदम मुख्यमंत्री जनकल्याण कक्षाचे समन्वयक ओमकेश नेरकर यांच्यासह सर्व शिवसेना पदाधिकारी व शिवसैनिक उपस्थित होते.

◆ पान ४ वरून पुढे...

## संततधार पावसाने ओलांडली...

मंडळ १७१. ५ाा,माजलगाव तालुक्यातील,गंगामसला महसूल मंडळ १७१.०ाा,परळी तालुक्यातील,सिरसाळा महसूल मंडळ १५५.३ ाा,धारुर तालुक्यातील,अंजनडोहमहसूलमंडळ१०८.८ाा,पैठणयेथीलजायकवाडी धरण ८७ टक्क्याहून अधिक भरल्यानंतर यातून ताशी ५०० दिवसात निसर्ग माजलगाव धरणासाठी सुरू करण्यात आलेला आहे. सदर पाणी जिल्ह्यात दाखल झाल्याचे शहागड येथील पुलावरून स्पष्ट निदर्शनास येत आहे.

बीड जिल्ह्यातील बिंदुसरा प्रकल्प देखील पूर्ण क्षमतेने भरला असून बीड शहरालगत बिंदुसरा नदी मधून दुथडी पाणी वाहताना दिसत आहे. पाण्याची आवक सुरू असल्याने नदीकाठच्या नागरिकांनी सतर्कता बाळगावी अशा सूचना जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात आल्या आहेत.अनेक ठिकाणी झालेल्या अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर पाऊस थांबताच शेतीचे पंचनामे करण्याचे निर्देश जिल्ह्याचे पालकमंत्री तथा राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी रविवारी जारी केले आहेत.

## नुकसानग्रस्त पीक विमाधारक..

पडून लागलेली नैसर्गिक आग इत्यादी कारणामुळे पिकाचे नुकसान झाले असल्यास. यासह ज्या पिकांची काढणीनंतर शेतात पसरवून अथवा पेंड्या बांधून सुकवणी करणे आवश्यक असते अश्या कापणी/ काढणी नंतर सुकवणीसाठी शेतात पसरवून ठेवलेल्या अधिसूचित पिकांचे काढणीनंतर दोन आठवड्यांच्या आत(१४ दिवस) गारपीट,चक्रीवादळ, चक्रीवादळामुळे आलेला पाऊस आणि बिगर मोसमी पावसामुळे नुकसान झाले असल्यास खरीप हंगाम २०२४ मध्ये पिक विमा भरलेल्या शेतकरी बांधवांनी ७२ तासात पिक विमा कंपनीकडे ऑनलाइन तक्रार करावी.

नुकसानग्रस्त पीक विमाधारक शेतकरी बांधवांनी वेळीच तक्रारी दाखल कराव्यात. पिक विमा कंपनीला तक्रार देण्यासाठी कृषी व शेतकरी कल्याण विभागामार्फत विकसित क्रॉप इन्शुरन्स अप्लिकेशन पुढील लिंक द्वारे गूगल प्ले स्टोर वरून डाऊनलोडकरून घ्यावे.

https://play.google.com/store/apps/details?id=in.farmguide.farmerapp.central या अप्लिकेशनचा वापर करून त्याद्वारे माहिती द्यावी. अधिक माहितीसाठी तालुका व जिल्हा कृषी कार्यालयातील खालील विमा प्रतिनिधी यांच्याशी संपर्क साधावा. असे आवाहन बीड जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, श्री सुभाष साळवे यांनी केले आहे. तसेच जर काही अडचण आल्यास कंपनीचा टोल फ्री क्रमांक १४४४७ असा असा ई-मेल पुढील प्रमाणे आहे. ळिर्झींळाररळलेषळपवळर.लो यावरही संपर्क करू शकता, असे ही सांगितले आहे.

## बैल पोळा सन उत्साहात..

कार्यकर्ते तथा युवा नेते अशोक दादा ढोले पाटील आपले मनोगत योकत करताना शेतकऱ्यांसोबत जन्मभर कष्ट करणाऱ्या बैलांच्या ऋणाची उतराई होऊ तर शकत नाही पण त्यांची पूजा करून त्यांच्याप्रती एक कृतज्ञता व्यक्त करता येऊ शकते.आसे सर्व शेतकरी बांधवांना माझ्याकडून व माझ्या परिवाराकडून बैल पोळा सनाच्या. हार्दिक हार्दीक शुभेच्छा दिल्या यावेळी सोबत बहु संख्येने गावकरी प्रकाश तावरे,अमोल शिंदे, देविदास तावरे, प्रथमेश खरसाडे, युवराज खरसाडे,सह आदी गावातील नागरिक उपस्थित होते.

## शिक्षक दिना पासून...

शिक्षण घेत आहेत, त्यांच्यामध्ये यामुळे न्यूनगंडाची भावना होताना दिसून येत आहे. व यामुळे पालक वर्गामध्ये देखील जिल्हा परिषद शाळेकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलत चालला आहे. विद्यार्थ्यांना भौतिक सुविधा मिळत नसल्याने त्यांच्यात नाराजीचा सूर उमटत असून, त्याचा परिणाम शाळेतील पटसंख्येवर पडत असल्याचे दिसून येत आहे. या सर्व बाबीचा गांभीर्याने विचार करून प्रशासनाने दि.०५ सप्टेंबर २०२४ पूर्वी विद्यार्थ्यांना या सुविधा उपलब्ध करून द्याव्यात अन्यथा महासंघाच्या वतीने गट शिक्षणाधिकारी कार्यालयासमोर दररोज शासकीय सुट्ट्या वगळता सायंकाळी पाच ते सहा या दरम्यान बेमुदत धरणे आंदोलन करण्यात येणार असल्याचा इशारा महासंघाचे जिल्हा मुख्य संघटक भारत टाकणखार सचिव अभिमन्यू इबिते जिल्हा उपाध्यक्ष वसंत टाकणखार, राजकुमार सोनवणे, कृष्णा हौसरमल, किरण शिंदे, निलेश गावडे, नारायण भाळशंकर, जीवन डोंगरे, शिवाजी भाळशंकर, किरण माने, हनुमंत पांढरपोटे, नागनाथ पडलवार, प्रवीण जाधव, राजेंद्र सातपुते, राहुल खुणे, नितीन पुटवाड, बळीराम घनघाव, गोविंद पवार, अमोल राऊत, अविनाश येळंबकर, सय्यद आयुब, शिवाजी व्यवहारे, शंकर पवार, सुमित घाडगे व शिक्षण विभाग प्रमुख रवी आदमाने विजय वैरागे आदींनी दिला आहे.

## आर्थिक शिस्त लावून...

१.३० या दरम्यान झाली यावेळी ते बोलत होते. पुढे बोलतांना अध्यक्ष डॉ.आदित्य सुभाषचंद्र सारडा म्हणाले की, सध्या बँकिंग क्षेत्रामध्ये झपाट्याने होत असलेल्या बदलानुसार बँकेचे सभासद व ग्राहकांना सर्व प्रकारच्या बँकिंग सोई सुविधा व सेवा देण्यासाठी संचालक मंडळ कटिबद्ध आहे. निर्बंध अहवाल चालू वर्षात बँकेला ऑडिटचा 'अ' वर्ग मिळाला आहे. बँक आज रिझर्व बँकेच्या संपूर्ण कायद्याप्रमाणे चालत आहे. बँकेचा NP मोठ्या प्रमाणात कमी झाला असल्याचे ते यावेळी म्हणाले.

यावर्षी २१ वसुली पथके तयार केले असून प्रत्येक कर्मचाऱ्यास ८ ते १० खाते नेमून दिले आहेत. त्यामुळे वसुलीस वेग आला असून थकीत कर्जावर कलम १०१ ची कार्यवाही, सेक्युरिटायझेशनची कार्यवाही, १३८ च्या केसेस, कर्जदार व जामीनदार यांचे इतर बँकेतील खाते गोठवणे, कलम ९१ ची कार्यवाही मोठ्या प्रमाणात चालू आहे. कर्जाची रक्कम न भरलेल्या थकीत कर्जदारावर स्थावर व जंगम मालमत्तेचा जाहीर लिलाव करण्याची कार्यवाही करत आहोत. बँकेचे अहवाल वर्षात १६ कोटी वसुली झाली आहे. परंतु, दुर्दैवाने बँकेचे नियमित असलेले कर्ज खाते कमी झाल्यामुळे व्याजाचं उत्पन्न कमी झाले आहे. बँकेकडे एकूण निधी ९१ कोटी ०८ लाख आहे. तर राखीव निधी १५ कोटी २८ लाख आहे. इमारत निधी २ कोटी ७१ लाख आहे, बुडीत व संशयित निधी ५५ कोटी ७५ लाख आहेत. बँक पूर्णतः सक्षम होण्यासाठी भाग भांडवल वाढवण्याची गरज होती. त्यामुळे संचालक मंडळाने सभासदांना आवाहन केले त्यास बँकेच्या सभासदांनी मोठ्या प्रमाणात प्रतिसाद दिला. त्यामुळे बँकेचे एकूण वसूल भाग भांडवल रु.२० कोटी २८ लाख झाले. रिझर्व बँकेच्या परिपत्रक, नियमानुसार बँकेचे सी.आर.ए.आर.चे प्रमाण ९ टक्के असल्यास बँक उत्तम आहे असे म्हटले जाते. आपल्या बँकेचे सी. आर. ए. आर. चे प्रमाण हे ५८.४९ टक्के असल्याचे आदित्य सारडा यांनी सांगितले.

यावेळी गत अहवाल वर्षात ज्या वसुली अधिकाऱ्यांनी चांगले काम केले अश्या बोन्दार्डे प्रशांत, आस्वले सतीश, कुलकर्णी संतोष, शिंदे नंदकुमार, जाधव शकुंतला या वसुली अधिकाऱ्यांना व त्यांच्या सहकाऱ्यांना सर्व संचालकाच्या सहभागातून रोख बक्षीस व सन्मान पत्र देऊन गौरविण्यात आले. यावेळी बँकेचे उपाध्यक्ष शुभम चितलांगे, सि.ए.गिरीशजी गिल्डा, डॉ.आदिती सारडा, अंजली पाटील, डॉ.अरुण मुंडे, रघुनाथ चौधरी, राहुल खडके, दिनेश देशपांडे, शेख मोहम्मद सलीम, प्रल्हाद वाघ, सुधाकर वैष्णव, राम गायकवाड, सतीश धारकर यांची उपस्थिती होती. सूत्रसंचालन बँकेचे प्र.मुख्यकार्यकारी अधिकारी शफियोद्दीन हिसामोद्दीन मोमीन यांनी तर आभार बँकेचे संचालक संतोष लहाने यांनी मानले.

## बीडच्या हजारो तरुणांना...

आपणास शब्द देतो की, मी लवकरच आपली मागणी पूर्ण करण्यासाठी मुख्यमंत्री शिंदे साहेबांना बोलेल आणि त्यांना बीडमध्ये युवा कौशल्य विकास योजनेचा महामेळावा आयोजित करण्यासाठी सांगेल ज्यातून बीडमधील तरुणांना चांगल्या पगारच्या नौकऱ्या मिळतील असे माजीमंत्री तथा शिवसेना मराठवाडा संपर्क नेते मा. अर्जुनराव खोतकर यांनी शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांना अभिवचन दिले.

दि. १ सप्टेंबर रोजी सकाळी ११.३० वाजता माँ वैष्ण पॅलेस बीड येथे जिल्ह्यातील सुशिक्षित आणि दुर्दैवाने बेरोजगार असलेल्या युवक युवतींसाठी नौकरीची सुवर्णसंधी प्राप्त करून देण्याच्या उदात्त हेतूने बीड जिल्हा शिवसेनेच्या वतीने अनिलदादा जगताप यांच्या नेतृत्वाखाली भव्य नौकरी भरती मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास उदघाटक म्हणून माजी मंत्री शिवसेना मराठवाडा संपर्क नेते मा. अर्जुनरावजी खोतकर साहेब होते तर शिवसेना जिल्हा संपर्क प्रमुख बापुसाहेब मोरे साहेब, जिल्हा संपर्क प्रमुख जालना

पंडित भुतेकर, जालना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे, आमचे मित्र महाराष्ट्र राज्य व्यापारी महासंघाचे महामंत्री संतोषसेठ सोहनी, डीएचओ गंडाळ साहेब, बीडीओ सानप साहेब, तालुका आरोग्य अधिकारी कासट साहेब, जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, महाराष्ट्र महिला आयोगाच्या सदस्या ऍडव्ह संगीता चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती लाभली होती तर शिवसेनेचे सर्व पदाधिकारी, महिला आघाडीच्या सदस्या तसेच लोकप्रतिनिधी, शिवसैनिक, पत्रकार बांधवांच्या उपस्थितीत नौकरी मेळाव्याचे उदघाटन मोठ्या थाटामाटात पार पडले. प्रतिक कांबळे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करत नौकरी भरती मेळाव्याची माहिती दिली. भर पावसात हजारोंच्या संख्येने सकाळी १०.०० वाजल्यापासून ते सायं ६.०० वाजेपर्यंत सुरु असलेल्या नौकरी भरती मेळाव्यात हजेरी लावलेल्या बीडमधील तब्बल १३२७ युवक-युवतींना जागीच मान्यवरांच्या शुभहस्ते नौकरीचे नियुक्तीपत्र देण्यात आले. यामध्ये १४ हजार रुपयांपासून ते ३२५०० रुपयांपर्यंत पगाराची नौकरी युवक-युवतींना मिळाली. कार्यक्रमाचे उदघाटक मान्यवर मा. अर्जुनराव खोतकर साहेब आणि बापुसाहेब मोरे साहेब यांनी युवा वर्गास सक्षम करण्याकरिता बीड शिवसेनेने घेतलेल्या पुढाकाराचे कौतुक केले. याबरोबरच उपस्थित असलेल्या युवक-युवतींना मार्गदर्शन करत नौकरी भरती मेळाव्यातून स्वतःचा उत्कर्ष साधा, कुटुंबाची जबाबदारी उचलून आयुष्याची वाटचाल समृद्ध करा असे सांगत शुभेच्छा दिल्या.

मुख्यमंत्री शिंदे साहेबांच्या सहकार्यातून बीडच्या तरुणांना सक्षम करण्याचा आमचा संकल्प-अनिलदादा जगताप

महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष तथा लाडके मुख्यमंत्री मा. एकनाथजी शिंदे साहेब आणि खासदार डॉ श्रीकांतजी शिंदे साहेब यांच्या कार्यपद्धतीस प्रेरित होऊन नौकरी याठिकाणी भरती मेळाव्याचे आयोजन केले. ऊसतोड कामगारांचा जिल्हा ही ओळख पुसण्याचे काम आम्ही सुरु केलंय. युवक-युवती कामासाठी इतर जिल्ह्यात भटकंती करावी लागते तेंव्हा त्यांना प्रचंड अडचणी येतात. बीडच्या मुलांना शेती करता येत नाही, नौकरी करता येत नाही. परिस्थितीचं दुखणं सांगताही येत नाही आणि सहनही होत नाही. युवा वर्गाची ही अडचण लक्षात घेऊन त्यांच्या सक्षमीकरनाचा संकल्प हाती घेतला आहे. येणाऱ्या काळात मुख्यमंत्री शिंदे साहेबांच्या सहकार्यातून युवा वर्गास आर्थिक बाजूने आम्ही सक्षम करणार आहोत असे शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप यांनी आपल्या भाषणात सांगितले.

# ◆ थोडक्यात...

## संततधार पावसाने पिकाचे नुकसान प्रशासनाने पंचनामे करावेत : शेळके

बीड । प्रतिनिधी



जिल्ह्यातील सर्व धूर पावसाने जोरदार हजेरी लावली त्यामुळे अनेक भागात पूरग्रस्त परिस्थिती निर्माण झाल्याने शुक्रवार शनिवार का येते का नाही व रविवार दिवसभर सगळीकडेच अति दृष्टी पाऊस झालेला आहे दिवसभर पावसाच्या सरी कोसळत राहिल्याने शेतकऱ्याचे तारांबळ उडाली आहे शेतकऱ्याचे उभ्या पिकात पाणी साचले त्यामुळे सोयाबीन कापुस पिकांना धोका निर्माण झाला आहे उत्पन्नावर याचा विपरीत परिणाम होणार असल्याने बळीराजा धास्तवला आहे काढणीस आलेले मूग उडीद बाजरी या पिकाचे पूर्ण नुकसान झालेले आहे काही ठिकाणी जमीन खरडून गेल्या गेल्याने या भागातील शेती पिकाचे प्रचंड नुकसान झालेले आहे तरी शासनाने बीड जिल्ह्यातील पिकाचे पंचनामे करावेत अशी मागणी अखिल भारतीय मराठा महासंघाचे शहराध्यक्ष दत्ता शेळके यांनी केली आहे.

## बैल पोळा साजरा !



वडवणी । प्रतिनिधी

जगाचा पोशिंदा असणाऱ्या माझ्या शेतकरी बांधवांच्या खांद्याला खांदा लावून काम करणाऱ्या बैल पुजनाचा दिवस म्हणजे बैलपोळा सण या बैलपोळ्याच्या निमित्ताने आज कदम वस्ती येथे पारंपरिक पद्धतीने सर्जा-राजाला सजवून पुजन करून बैलपोळा साजरा केला. यावेळी पांडुरंग लांडे, अशोक लांडे, नामदेव लांडे स्वरूपचे पांडुरंग बिंदगे, ज्ञानेश्वर कदम, दत्ता कदम, गणेश लांडे, गोविंद लांडे, रवि लांडे, पत्रकार संभाजी लांडे आदी उपस्थित होते.

## ढोले वस्ती इमामपुर रोड बीड येथे संगीतमय भागवत कथेचे आयोजन: कथा प्रवक्ते ह.भ.प सचिन महाराज सपकाळ

बीड । प्रतिनिधी



येथील रहिवासी कै.सुभाष उत्तमराव ढोले यांच्या प्रथम पुण्यस्मरण निमित्त बीड येथील सुप्रसिद्ध भागवत कथा प्रवक्ते राधेश्याम कृपांकित श्री ह.भ.प.सचिन महाराज सपकाळ यांच्या सुमधुर वाणीतून भागवत कथेचे आयोजन करण्यात आलेले आहे. या भागवत कथेची सुरुवात मंगळवार दि. ०३/०९/२०२४ रोजी होतं असून सांगता सोमवार दि.०९/०९/२०२४ रोजी होणार आहे. कथेची वेळ दररोज दुपारी ०१ ते०५ असून या संगीत भागवत कथेसाठी संगीत गायन साथ ह.भ.प.आई कुसुमताई सपकाळ, ह.भ.प. पवन महाराज सपकाळ, तबला साथ-ह.भ.प. जगन्नाथ महाराज कराळे यांची तर सिंथ व गायनसाथ ह.भ.प.माऊली महाराज घुमरे यांची लाभणार आहे.या सात दिवस चालणाऱ्या सप्तरंगी कथेचे श्रवण सर्व भाविक भक्त व माता भगिनी बाल गोपाळ व पंचक्रोशीतील भावीक भक्तांनी करावे असे आवाहन समस्त ढोले परिवार, ढोले वस्ती इमामपूर रोड बार्शी नाका बीड यांनी केले आहे.

## पवारवाडीत सतत चार दिवस जनावरे,वाहने,शेत अवजारे चोरून नेली; गुन्हे दाखल करून पोलीस मोकळे; चोरटे मात्र मोकाटच!

माजलगाव । प्रतिनिधी



माजलगावच्या ग्रामीण भागात गाव तांडा वस्तीसह शेतात चोरीच्या घटना दिवसेंदिवस वाढत आहेत. पवारवाडी येथे सतत चार दिवसात ट्रॅक्टर,मोटरसायकल,शेत अवजारे, जनावरे चोरून नेण्यात आली आहेत.परंतु पोलिसांकडून चोरीच्या घटनांवर कुठलेही नियंत्रण राहिले नाही.फक्त गुन्हे दाखल करून घेण्याचा सोपस्कार पोलिसांकडून पार पाडल्या जात आहे.यामुळे गाव खेड्यात,शेतवस्तीवर वास्तव करणाऱ्या नागरिकांमध्ये पोलिसांविषयी तीव्र नाराजी आहे. माजलगाव तालुक्यात ग्रामीण भागात गाव खेड्यात दिवसेंदिवस चोरीच्या घटना वाढताना.त्यात मोटरसायकल चोरीचे प्रमाण तर आठवड्यात एक तरी घटना घडल्याशिवाय राहत नाही. त्याचप्रमाणे शेतीत असणारे अवजारे रेगुलर चोरीला जात आहेत.सौर ऊर्जा पॅनल चोरून नेल्या जात आहेत.भुरट्या चोऱ्या ही गावकऱ्यांची सतत डोकेदुखी झाली आहे.दरम्यान याबाबत पोलिसांकडे सतत तक्रारी केल्या जात आहेत.घडलेल्या चोरीच्या घटनांचे गुन्हे देखील दाखल केले जात आहेत.मात्र चोरीच्या घटनावर पोलिसांकडून कुठलेही नियंत्रण दिसत नाही.फक्त गुन्हे दाखल करून घेण्याचे सोपस्कार पार पाडल्या जात आहेत.परंतु चोरीच्या घटनेतील एकही चोर जेरबंद करण्यात आल्याचे उदाहरण नाही. शनिवार दि.३० रोजी पवारवाडी येथील शेतकरी यशवंत बाजीराव जाधव यांचे ट्रॅक्टर चोरून नेण्यात आले आहे.त्याचप्रमाणे याच गावात शेळ्या,गाय बैल,अवजारे,सौर ऊर्जा चोरून नेण्याच्या सतत चार घटना घडल्या आहेत.त्यामुळे चोरट्यांना पोलिसांची भीतीच नसल्याने सतत चोरीच्या घटना वाढत आहेत.पोलिसांच्या नागर्तेपना बद्दल गावकऱ्यांमध्ये तीव्र स्वरूपाची नाराजी पसरली आहे.जिल्हा पोलीस अध्यक्षांनी याबाबत लक्ष देण्याची मागणी गावकऱ्यांकडून होत आहे.

# सन २०२३ खरीप हंगामातील कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांसाठी खुशखबर

### कापूस-सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना मंजूर अर्थ सहाय्य 10 सप्टेंबर पासून वाटप सुरू करण्याचे कृषी मंत्री धनंजय मुंडे यांचे निर्देश

मुंबई । प्रतिनिधी

सन २०२३ खरीप हंगामातील कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना ४१९४.६८ कोटी रुपये अर्थसहाय्य मंजूर करण्यात आले आहे. कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांच्या अर्थ सहाय्य वाटपात येणाऱ्या तांत्रिक अडचणी या महाआयटी व महसूल विभागाच्या सहाय्याने तत्काळ सोडवूण शेतकऱ्यांना येत्या १० सप्टेंबर पासून अर्थ सहाय्य थेट खात्यात वितरित करण्याचे निर्देश कृषी मंत्री धनंजय मुंडे यांनी आज झालेल्या बैठकीत दिले आहेत.

सन २०२३ खरीप हंगामातील कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना अर्थ सहाय्य वाटपात येणाऱ्या अडचणी बाबतीत आढावा बैठक कृषी मंत्री धनंजय मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली दूरदृष्य प्रणालीद्वारे आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी श्री मुंडे बोलत होते. यावेळी कृषी विभागाच्या सचिव श्रीमती जयश्री भोज, कृषी आयुक्त रविंद्र बिनवडे, कृषी संचालक विजयकुमार आवटे, माहिती व तंत्रज्ञान विभागाचे अधिकारी आणि कृषी विभागाचे संबंधित अधिकारी दूरदृष्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.



यावेळी श्री मुंडे मुंडे म्हणाले, सन २०२३ च्या खरीप हंगामातील कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना ०.२ हेक्टर पेक्षा कमी क्षेत्रासाठी सरसकट १००० रुपये तर ०.२ हेक्टर पेक्षा जास्त क्षेत्रासाठी त्यांच्या क्षेत्रानुसार प्रति हेक्टर रुपये पाच हजार (दोन हेक्टरच्या मर्यादेत) अर्थ सहाय्य मंजूर करण्यात आले आहे. यामध्ये कापूस उत्पादक शेतकऱ्यांसाठी १५४८.३४ कोटी रुपये, सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांसाठी २६४६.३४ कोटी रुपये असे एकूण ४१९४.६८ कोटी रुपये अर्थसहाय मंजूर करण्यात आले आहे. खरीप हंगाम २०२३ च्या कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना मंजूर अर्थ सहाय्य देण्याबाबतची कार्यपद्धती ३० ऑगस्ट २०२४ रोजी शासनाने जाहीर केली आहे.

कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांच्या अर्थ सहाय्य वाटपात येणाऱ्या तांत्रिक अडचणी या महाआयटी व महसूल विभागाच्या सहायाने कृषी विभागाने तत्काळ सोडवूण शेतकऱ्यांना १० सप्टेंबर पासून अर्थ सहाय्य वाटप सुरू करण्यात यावे असे निर्देश कृषी मंत्री श्री मुंडे यांनी दिले आहेत.

मागील वर्षी नैसर्गिक असमतोलामुळे राज्यभरातील सोयाबीन व कापूस उत्पादक शेतकऱ्यांचे उत्पादनात तर दुष्काळानंतर भाव पडल्याने विक्रीमध्ये असे नुकसान झाले होते. त्यावर उपाय म्हणून लोकसभा निवडणूक लागण्याच्या अगोदरच धनंजय मुंडे यांनी २०२३ सालच्या सोयाबीन व कापूस उत्पादक शेतकऱ्यांना हेक्टरी पाच हजार रुपये अनुदान देण्याची घोषणा केली होती; त्यानुसार नुकत्याच झालेल्या अर्थसंकल्पात यासाठी निधीची तरतूद करण्यात आली असून आता येत्या दहा तारखेपासून शेतकऱ्यांच्या खात्यावर थेट निधी वर्ग करण्यास सुरुवात होणार आहे.



राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी शहरानजीक माळावरील शेतात बैलपोळा सणानिमित्त सर्जा-राजाचे पूजन केले. याप्रसंगी डॉ.दीपाताई क्षीरसागर, डॉ. सारिकाताई क्षीरसागर आदींची उपस्थिती होती.



तुझ्या अपार अपार कष्टानं । बहरते सारी भुई ।। एका दिवसाच्या पुजेनं । होऊ कसा उतराई ।। गेवराई ता सिरसमार्ग येथे लंबे परिवाराच्या वतीने बैलपोळा सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला . सर्व शेतकरी बांधवांना बैल पोळ्याच्या हार्दिक शुभेच्छा..!

# आष्टी मतदारसंघाला भिमराव धोंडे यांच्या नावाची गरज : बोधले महाराज

### ▸ सत्याचा विजय होत असतो : विठ्ठल महाराज; ▸ शेतीपुरक उद्योग उभारावेत : भिमराव धोंडे

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी पाटोदा शिरूर विधानसभा मतदार संघाला भिमराव धोंडे यांच्या नावाची गरज आहे. एवढ्या ताकदीचे व्यक्तीमत्व मतदारसंघात दुसरे नाही. शेतकरी आणि शिक्षण या दोन महत्त्वाच्या गोष्टी म्हणजे माजी आमदार भीमराव यांचा श्वासोच्छ्वास आहे असे ह.भ.प. प्रकाश महाराज बोधले यांनी सांगितले . आपण मतदारसंघासाठी मोठे कार्य केले आहे याचे फळ निश्चित मिळेल. सत्य सत्यच असते, सत्याचा विजय होत असतो असे ह.भ.प. विठ्ठल महाराज शास्त्री यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या अध्यक्षपदावरुन बोलताना माजी आमदार भीमराव धोंडे यांनी सांगितले की,




लोकसंख्येच्या तुलनेत आज प्रत्येक व्यक्तीला सरासरी दोन ते तीन एकर जमिन मिळू शकते, भविष्यात ही परिस्थिती गुंठ्यांवर येईल त्यामुळे शेतकऱ्यांनी कृषी प्रदर्शनाच्या माध्यमातून ज्ञान आत्मसात करीत शेती पुरक उद्योग उभारावेत.

वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणी अंतर्गत श्री. छत्रपती शाहू, फुले, आंबेडकर, कृषी महाविद्यालय आष्टी यांच्या वतीने व शेतकऱ्यांचे नेते माजी आमदार भीमराव धोंडे यांच्या संकल्पनेतून २९ ऑगस्ट ते १ सप्टेंबर २०२४ या कालावधीत मराठवाड्यातील सर्वात मोठे डॉ. स्वामीनाथन राज्यस्तरीय दुसरे कृषी प्रदर्शनाचा गहिनीनाथ गडाचे मठाधिपती हभप विठ्ठल महाराज शास्त्री व अखिल भारतीय वारकरी मंडळाचे अध्यक्ष हभप प्रकाश महाराज बोधले यांच्या प्रमुख उपस्थितीत रविवारी समारोप झाला. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आयोजक माजी आमदार भीमराव धोंडे हे होते. याप्रसंगी व्यासपीठावर स्वागताध्यक्ष भाजपा युवा मोर्चाचे जिल्हा सरचिटणीस अजयदादा धोंडे, चेअरमन राजेश धोंडे,अभयराजे धोंडे,विठ्ठल आण्णा बनसोडे, जिल्हा कृषी अधिकारी बाबासाहेब जेजूरकर, उपसभापती पांडुरंग नागरगोजे, जेष्ठ संपादक प्रा. अनंतराव हंबर्डे, ह.भ.प. दिनकर तांदळे महाराज, रिपाईचे तालुकाध्यक्ष अशोक साळवे, संजय कांकरिया, तालुका कृषी अधिकारी गोरख तरटे, भाऊसाहेब सायंबर, दिलीपराव काळे,बाजीराव वाल्हेकर, बाजार समितीचे संचालक आण्णासाहेब लांबडे,माजी गटशिक्षणाधिकारी श्रीराम टेकाळे, व इतर उपस्थित होते.

रिपाईचे तालुकाध्यक्ष अशोक साळवे यांनी भिमराव धोंडे यांचा भावी आमदार असा उल्लेख केला. यावेळी कु. भक्ती गिरी या विद्यार्थ्यांनीने देखील उत्कृष्ट भाषण केले. कार्यक्रमास भाजपाचे जिल्हा सरचिटणीस शंकरराव देशमुख, डॉ. विश्वास मुळे, महाराष्ट्र केसरी सईद चाऊस,, ग्रा. पं. सदस्य आदेश निमोनकर, युवा नेते आस्ताक शेख, हादी शेख,

रघुनाथ शिंदे, बाबुराव कदम, विठ्ठलराव लांडगे, डॉ. मनोज पाचे, माजी सभापती अनिल जायभाय, सदाशिव दिंडे, सेवानिवृत्त पीएसआय शेख,बबन सांगळे, कुंडलिक आस्वर, कोंडीबा साबळे यांच्या सह, संयोजन समितीचे अध्यक्ष डॉ बी राऊत, प्रा. शिवदास विधाते, माऊली बोडखे, संजय शेड़े तसेच शेतकरी व कृषी महाविद्यालयाचे विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना प्राचार्य श्रीराम आरसुळ यांनी सांगितले की, एक लाख तीन हजार शेतकऱ्यांनी भेटी दिल्या तसेच तालुक्यातील सुमारे ५५ शाळेतील विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी भेटी दिल्या तसेच जवळपास १० कोटी रुपयांची उलाढाल झाली. त्याचप्रमाणे चार ट्रॅक्टर व एक फवारणीचे ब्लोअर विकले गेले.


## वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

**श्री. आर. आर. जाधव ४ थे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, गेवराई**

**गेवराई, जि.बीड यांचे न्यायालयात दिवाणी**
**किरकोळ अर्ज क्र. ६५०/२०२४**
**यमुनाबाई व ईतर ३ वि. निरंक**
**(मार्फत - ॲड. जी.एम. कोल्हे. गेवराई)**

ज्याअर्थी मयत नामे बप्पासाहेब पि. उध्दव कोळेकर, रा. मौजे सिरसमार्ग, ता. गेवराई, जि. बीड हे दिनांक १३/०२/२०१९ रोजी मौजे रा. मौजे सिरसमार्ग, ता. गेवराई येथे मयत झाले

अर्जदार :- १) यमुनबाई भ्र. उध्दव कोळेकर, वय ६५ धंदा घरकाम व शेती रा. सिरसमार्ग, ता. गेवराई, जि. बीड. २) दैवशाल भ. बप्पासाहेब कोळेकर, वय ३५ धंदा शेती. ग. सिरसमार्ग, ता. गेवराई, जि. बीड. ३) धनश्री बप्पासाहेब कोळेकर, वय १३. अ.पा.क. आई अर्जदार क ० २ दैवशाल भ. बप्पासाहेब कोळेकर, वय ३५. धंदा शेती. ग. सिरसमार्ग, ता. गेवराई, जि. बीड. ४) गणेश पि. बप्पासाहेब कोळेकर, वय ११. अ.पा.क. आई अर्जदार क्र. ०२ दैवशाल भ. बप्पासाहेब कोळेकर, वय ३५ धंदा शेती. रा. सिरसमार्ग, ता. गेवराई, जि. बीड.

अर्जदार यांनी सदरहू मयताच्या नावे खालील प्रमाणे रक्कम जमा आहे.

**अ. क्र., बॅकेच नाव / कंपनीचे/नाव / जीवन बिमा निगमचे नाव, क्रमांक, रुपये पै.**

१. सेंट्रल बँक ऑफ इंडिया शाखा सिरसमार्ग ता. गेवराई, जि. बीड, खाते क. ३११०१४१४६८, रु. ३४.८९१.१६/- अक्षरी चोवतीस हजार आठशे एक्यानव रूपये व सोळा पैस व त्यावरील व्याज.

वरील रक्कम मिळणेकामी अर्जदारांना वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता भारतीय वारसा कायदा कलम ३७२ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत नामे बप्पासाहेब पि. उध्दव कोळेकर, रा. मौजे सिरसमार्ग, ता. गेवराई, जि. बीडयांने वारसाने प्रमाणपत्र देण्यात येईल. आज दिनाक १९/०८/२०२४ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले. **पुढील तारीख ०३/१०/२०२४.**

आदेशावरून.
(स्वाक्षरीत) शिक्का (स्वाक्षरीत)
क.लिपीक सहाय्यक अधीक्षक
दिवाणी न्यायालय क. स्तर, गेवराई

## जाहीर प्रगटन

**मा. श्रीमती एस. एस. पिंगळे, दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क. १२०० / २०२४**
**जनाबाई भ्र. सुदाम उबाळे वि. निरंक**
**ॲड. ए.एस.बीडकर यांच्या मार्फत**

अर्जदार- १. जनाबाई भ्र. सुदाम उबाळे, वय ७० वर्षे, धंदा घरकाम, रा. च-हाटा, ता. जि. बीड. २. सुशीलकुमार पि. सुदाम उबाळे, वय ४९ वर्षे, धंदा वकिली, रा. वरील प्रमाणे. ३. श्रीराम पि. सुदाम उबाळे, वय ४६ वर्षे, धंदा नोकरी, रा. वरील प्रमाणे. ४. शहादेव पि. सुदाम उबाळे, वय ४४ वर्षे, धंदा शेती, रा. वरील प्रमाणे.

गैरअर्जदार - निरंक

प्रकरण- भारतीय वारसा कायदा १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी मयत सुदाम भगवानराव उबाळे, यांचे वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

**मयत सुदाम भगवानराव उबाळे, हे दिनांक ०५/०६/२०२४ रोजी मौजे च-हाटा, ता. जि. बीड** येथे मयत झालेले आहेत. अर्जदार क. १ ही मयताची पत्नी असून, अर्जदार क्र. २ ते ४ हे मयताचे मुले आहेत. अर्जदार क्र. १ ते ४ यांच्या शिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत.

अर्जदारांचे असेही म्हणणे आहे की, शासकीय व निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणुन सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु **मयत नामे सुदाम भगवानराव उबाळे,** या जाहिरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या न्यायालयात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु न्यायालय सदरहु अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु, मयत नामे **सुदाम भगवानराव उबाळे,** रा. च-हाटा, ता. जि. बीड यांचे अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस म्हणुन घोषीत करुन अर्जदारास वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल. याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**पुढील तारीख २७/०९/२०२४.** आज दिनांक २८/०८/२०२४ रोजी न्यायालयाच्या शिक्कयानिशी दिले.

आदेशावरून.
(स्वाक्षरीत) शिक्का (स्वाक्षरीत)
क.लिपीक सहा. अधीक्षक
दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड

## टी सी हरवला आहे

शुभम मधुकर हुंबे (मु. पो.पिंपळनेर ता.जी.बीड ) या नावाचा १० वी पास असलेला टी.सी. पिंपळनेर - बीड प्रवासात हरवला आहे. सापडल्यास खालील नंबरवर संपर्क साधावा.

**संपर्क क्रमांक : ९०२१७७००८०**

## टी सी हरवला आहे

आनेराव प्रगती आनंद या नावचा पिंपळनेर बीड प्रवासादरम्यान १०वी पासचा टि.सी. हरवला आहे. सापडल्यास खालील नंबरवर संपर्क साधावा.

**संपर्क क्रमांक : ७३८७४३८१८८**

## टी सी हरवला आहे

जयसिंग जालिंदर ढास या नावाचा इयत्ता १२वी चा टीसी हरवल्या बस प्रवसात हरवला आहे. सापडल्यास खालील नंबरवर संपर्क साधावा.

**संपर्क क्रमांक : ९३२२०२४२६४**

## टी सी हरवला आहे

निखिल बंडू कोल्हे या नावाचा इयत्ता १२ वी चा टि सी लिंबागणेश ते मांजरसुबा प्रवासात हरवला आहे. सापडल्यास खालील नंबरवर संपर्क साधावा.

**संपर्क क्रमांक : ९३२२४७७२३**




दैनिक **मराठवाडा पत्र**
महाराष्ट्राचा बुलंद आवाज
।बीड ।परभणी ।छत्रपती संभाजीनगर ।जालना ।लातूर ।धाराशिव ।हिंगोली ।नांदेड ।नगर






# संततधार पावसाने ओलांडली जिल्ह्याची सरासरी

## २०23 मध्ये याच दिनांकास होता केवळ ४७ टक्के पाऊस

**बीड । प्रतिनिधी**

या वर्षाच्या जून ते ऑगस्ट महिन्या दरम्यान पावसाळी सरासरीने जिल्ह्याची ६५५.५ इतकी सरासरी गाठली असून वार्षिक सरासरीच्या ११५ टक्के पावसाची नोंद पहिल्या तीन महिन्यात झाली आहे गतवर्षी हाच पाऊस या दिनांकास केवळ ४७.७ टक्के इतका होता.

यंदाच्या हंगामात पाऊस चांगला राहील असा अंदाज हवामान खात्याने वर्तविला होता त्यानुसार जिल्ह्यात सर्वच तालुक्यांमध्ये सरासरी ओलांडली गेली आहे व मुबलक प्रमाणात पावसाची नोंद सर्व ठिकाणी झाली आहे.

जिल्ह्यात जून ते सप्टेंबर ची वार्षिक सरासरी ५६६.१ मिमी. इतकी असताना यंदा १जून २०२४ पासून आतापर्यंत ६५५. ५ मिलिमीटर सरासरी पावसाची नोंद झाली आहे.

तालुका निहाय झालेल्या पावसाची टक्केवारी खालील प्रमाणे आहे बीड जिल्हा एकूण सरासरी ५६६.१ मिलिमीटर प्रत्यक्ष झालेला पाऊस ६५५.५ मिलिमीटर.

बीड तालुक्यात जून ते सप्टेंबर सरासरी ५९४.५ प्रत्यक्षात झालेला पाऊस ६६४.२ मिलिमीटर टक्केवारी १११.९, पाटोदा तालुक्यात ५३८.७ प्रत्यक्षात झालेला पाऊस ७४७.९ टक्केवारी १३८.८,आष्टी तालुक्यात ५४६.१ प्रत्यक्षात झालेला पाऊस ६०१.७ टक्केवारी ११०.२,आष्टी तालुक्यात ५४६.१ प्रत्यक्षात झालेला पाऊस ६०१.७ टक्केवारी ११०२,गेवराई तालुक्यात ५८७ प्रत्यक्षात झालेला पाऊस ६६०.८ टक्केवारी ११२.६,माजलगाव तालुक्यात ६१६.९ प्रत्यक्ष



झालेला पाऊस ६०८० टक्केवारी ११०.२,अंबाजोगाई तालुक्यात ६९८ ६३२.४ प्रत्यक्षात झालेला पाऊस टक्केवारी ११०.४,केज तालुक्यात ५८३.६ प्रत्यक्षात झालेला पाऊस ६१२ टक्केवारी १०४.९,परळी वैजनाथ तालुक्यात ६२८.१ प्रत्यक्षात झालेला पाऊस ६५७.९ टक्केवारी १०४.७,धारूर तालुक्यात ६६९.८ प्रत्यक्षात झालेला पाऊस ६८५.४ टक्केवारी १०२.३,वडवणी तालुक्यात ६०.७ प्रत्यक्षात झालेला पाऊस ६२७.३ टक्केवारी १०४.४,शिरूर का. तालुक्यात ५१५.६ प्रत्यक्षात झालेला पाऊस ६३२.६ टक्केवारी १२२.७

आज सकाळी प्राप्त नोंदीनुसार गेल्या २४ तासात बीड जिल्ह्यामध्ये एकूण ६१ महसूल मंडळामध्ये अतिवृष्टीची नोंद झालेली आहे. १०० मिलिमीटर च्या वर एकूण ३५ महसूल मंडळामध्ये अतिवृष्टीची नोंद झालेली आहे. सर्वात जास्त अतिवृष्टीची नोंद झालेले महसूल मंडळ,गेवराई तालुक्यातील रेवकी महसूल

.... (उर्वरित पान २ वर)

## थोडक्यात...

### आ. प्रकाश सोळंके यांना राष्ट्रकुल संसदीय मंडळाचा पुरस्कार

**माजलगाव । प्रतिनिधी**



राष्ट्रकुल संसदीय मंडळ महाराष्ट्र शाखेतर्फे सन २०२०-२१ करिता महाराष्ट्र विधानसभा उत्कृष्ट भाषण पुरस्कारासाठी माजलगाव मतदार संघाचे भाग्यविधाते तथा लोकप्रिय आमदार प्रकाश दादा सोळंके यांची निवड झाली असून दि. ३ सप्टेंबर रोजी राष्ट्रपतींच्या हस्ते आ. सोळंके यांचा विधान भवन मुंबई येथे सन्मान करण्यात येणार आहे. राष्ट्रकुल संसदीय मंडळ, महाराष्ट्र शाखेतर्फे महाराष्ट्र विधानमंडळाच्या सदस्यांना सन २०१८- १९, २०१९-२०, २०२०-२१, २०२१-२२, २०२२-२३ व २०२३-२४ या कालावधीसाठी देण्यात येणाऱ्या उत्कृष्ट संसदपटू व उत्कृष्ट भाषण या पुरस्कारांसंदर्भात पुरस्कार वितरण सोहळा कार्यक्रम मंगळवार, दि. ०३ सप्टेंबर, २०२४ रोजी दुपारी ०३.३० वाजता आ. प्रकाश सोळंके यांना मध्यवर्ती सभागृह, विधान भवन, मुंबई येथे राष्ट्रपती महोदयांच्या महाराष्ट्र विधानसभा उत्कृष्ट भाषण पुरस्कार माजलगाव मतदार संघाचे लोकप्रिय आमदार प्रकाशदादा सोळंके यांना राष्ट्रपती द्रोपदी मुर्मू यांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहे. दरम्यान आ. प्रकाश सोळंके यांना उत्कृष्ट भाषणाबद्दल चा पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल त्यांचे मतदार संघात तसेच सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

### जिल्हास्तरीय लोकशाही दिनात एकुण २ तक्रार अर्ज प्राप्त

**बीड । प्रतिनिधी**

जिल्हास्तरीय लोकशाही दिनामध्ये लोकशाही दिनात २ तक्रार अर्ज प्राप्त झाले. निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रगती सभागृहात लोकशाही दिन संपन्न झाला. यावेळी महसूल, जिल्हा परिषद, पाटबंधारे विभाग सार्वजनिक बांधकाम विभाग, परिवहन विभाग, सहकार विभाग, कृषी विभाग व पाणी पुरवठा विभाग, समन्वय अधिकारी इत्यादी जिल्हा स्तरावरील प्रमुख अधिकारी व ज्या कार्यालयाकडून लोकशाही दिनातील प्रलंबित प्रकरणे होती, ते संबंधित अधिकारी उपस्थित होते.

### शि.भ.प. रामभाऊ खरवड यांची शिव कीर्तन सेवा संपन्न




**बीड । प्रतिनिधी**

पवित्र तीर्थक्षेत्र संत शिरोमणी मन्मथ स्वामी संजीवन समाधी कपिलधार येथे काल दिनांक १ /९ /२०२४ रविवारी मासिक शिवरात्री निमित्त शिव कीर्तन सेवा संपन्न झाली. या कीर्तन सेवेसाठी महाराजांनी निरूपणासाठी पुढील अभंग घेतला होता- ।।मन्मथ स्वामी महाराज।।, ।।भक्ता दावी निजबीज।।-या संत.लक्ष्मण महाराज आष्टी यांच्या अभंगावर शि.भ.प. राजाभाऊ खरबड रामवडगाव यांनी सेवेसाठी अभंग घेतला होता आपल्या या अभंगावर महाराजांनी विवेचन करताना संत शिरोमणी महाराज यांच्या कार्यावर व भक्तीवर प्रकाश टाकला. अतिशय रसाळ वाणी मधून संत शिरोमणी मन्मथ स्वामी महाराज यांचे चरित्र सांगितले. या कीर्तन सेवेला धनेगाव भं.म अंबाजोगाई महीला भजनी मंडळ कोड ,भजनी मंडळ राम वडगाव,भ.मडळ कानडी, भ.मंडळ किर्तनकार विश्वनाथ स्वामी देवस्थान पुजारी, शि.भ प.सौ.सरस्वतीताई गंगाधर स्वामी अंबाजोगाई,शि.भ.प. राम लाखादिवे गुरूजी, शि.भ.प राजकुमार लखदिवे, शि.भ.प रमेश हीरे.व डॉ. प्रशांत स्वामी कपीलाधार, माहेश्वरमुर्ती.शंकर स्वामी महाराज जायफळकर ,वाळके आबा व गायक वादक शिवभक्त श्रोते महीला पुरूष हजारांच्या संखेत होते . तसेच श्री क्षेत्र कपिलधार येथील भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नुकसानग्रस्त पीक विमाधारक शेतकऱ्यांनी वेळीच तक्रारी करण्याचे : जिल्हा कृषी विभागाचे आवाहन

**बीड । प्रतिनिधी**

सध्या जिल्हयात सततचा पाऊस सुरू असल्यामुळे नुकसानग्रस्त पीक विमाधारक शेतकऱ्यांनी वेळीच तक्रारी कराव्यात, असे आवाहन करण्यात आलेले आहे.

'प्रधानमंत्री फसल बीमा योजना खरीप हंगाम २०२४' मध्ये 'भारतीय कृषी विमा कंपनी मार्यादित' यांच्यामार्फत बीड जिल्ह्यामध्ये राबविण्यात येत आहे.या अंतर्गत ज्या शेतकऱ्यांनी या काळांमध्ये पिकांचे स्थानिक नैसर्गिक आपत्ती या बाबी अंतर्गत विमा संरक्षित क्षेत्र जलमय झाल्यास,भूस्खलन,गारपीट, ढगफ ुटी, महापूर, दीर्घ काळ पाणी साचून झालेले नुकसान व चक्रीवादळ, वीज

**▸तालुका प्रतिनिधी यांचे संपर्क क्रमांक खालीलप्रमाणे**

**बीड तालुक्यात अविनाश सोनावणे (७०२०६२१७४७),पाटोदा तालुक्यात गोल्हार संपत (९७६४५५२२०३), आष्टी तालुक्यात लोंढे विनोद (९१४६८४०१०१), शिरूर कासार तालुक्यात विघ्ने गणेश (९७६७३५५९६९), माजलगाव तालुक्यात कुशेर आनंद (८३२९१३५७८९),गेवराई तालुक्यात चिकणे धनंजय (८४८२९१४४४४), धारूर तालुक्यात विशाल गायकवाड (७७०९८२६९२६), वडवणी तालुक्यात सावंत लहू (७३५०५०६३५५), अंबेजोगाई तालुक्यात पोटभरे नंदकुमार, (९४०३१८१४१४), केज तालुक्यात चौरे राहूल (८००७३३००२१), परळी तालुक्यात डापकर भागवत (९४०४८८६८८३), जिल्हा व्यवस्थापक इनकर बाबासाहेब (९८५०३१००५३) यांच्याशी संपर्क करण्याचे आवाहन जिल्हा कृषी विभागाने केले आहे.**

....(उर्वरित पान २ वर)

## बैल पोळा सन उत्साहात साजरा

**बीड । प्रतिनिधी**

दि २ सप्टेंबर रोजी शेतकऱ्यांच्या आनंदाचा सन म्हणजेच बैल पोळा या वर्षी खरीपाची पेरणी वेळेवर झाली असून पाऊसही समाधानकारक झाला आहे शेती हिरव्यागार पिकांने ओसंडून वाहत असल्यामुळे बैल पोळा हा सण उत्साहात साजरा केला बैलपोळा जगाचा पोशिंदा असलेल्या बळीराजाचा संपूर्ण भार ज्याच्या खांद्यावर असतो असा शेतकऱ्यांचा सवंगडी खरा मित्र बैल राजा या बैल राजाचा आज पोळा हा सन आहे या सणानिमित्त बैल राजाची पूजा केली



जाते दिवस-रात्र मेहनत करून शेतकरी धान्य पिकवतो आणि या पोशिंद्याचा (शेतकऱ्याचा) सोबती म्हणजेच त्याचा बैल राजा हा नेहमी शेतकऱ्यांसोबत प्रत्येक परिस्थितीमध्ये असतो त्यामुळे शेतकरी बैलपोळा हा सण उत्साहात साजरा करतात आणि बैलांप्रती कृतज्ञता व्यक्त केली जाते. म्हणून आज बैलपोळा सणानिमित्त बीड जिल्ह्यातील सुप्रसिद्ध सामाजिक

....(उर्वरित पान २ वर)

## मनोज जरांगे यांच्या घोंगडी बैठकीसाठी मराठा सेवकांकडून बीडला जनजागृती

**गावपातळीवर बैठका घेऊन सर्व ग्रामस्थांना दिले जातेय बैठकीचे निमंत्रण**



**बीड । प्रतिनिधी**

मराठा आरक्षण आणि विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने मनोज . जरांगे पाटील हे आता विधानसभा ना मतदारसंघनिहाय घोंगडी बैठका घेणार आहेत. बीड जिल्ह्यात ५ ते ९ सप्टेंबर दरम्यान पाच विधानसभा न मतदारसंघात बैठका होणार आहेत.

याच्या नियोजनासाठी सध्या गावपातळीपर्यंत जाऊन जिल्ह्यात ल बैठका घेतल्या जात असून, गावांना या बैठकीस येण्याचे निमंत्रण दिले जात आहे.

मराठा आरक्षणासाठी वर्षभरापासून मनोज जरांगे पाटील हे आंदोलन करत आहेत. यामुळे . कुणबी नोंदी शोधल्या गेल्या आहेत. मात्र सरसकट ओबीसीतून आरक्षण . देण्याच्या मागणीसाठी मनोज जरांगे ठाम आहेत. दरम्यान, आता जरांगे यांनी सत्ताधाऱ्यांना कोंडीत पकडत आगामी निवडणुकांत उमेदवार उभे करण्यासाठी चाचपणी सुरु केली आहे. याचाच एक भाग म्हणून विधानसभा मतदार संघनिहाय घोंगडी बैठका घेण्यात येणार आहेत. बीड जिल्ह्यात ५ सप्टेंबरपासून याला सुरुवात होणार आहे. ५ रोजी गेवराई, ६ रोजी माजलगाव. ८ रोजी परळी

आणि केज तर ९ सप्टेंबर रोजी बीड विधानसभा मतदार संघात घोंगडी बैठक होणार आहेत. या बैठकीलाही मराठा समाजाने उपस्थित राहावे यासाठी सध्या जनजागृती केली जात आहे. मराठा सेवक बैठका घेत आहेत. रमेश पोकळे, बी. बी. जाधव, हनुमंत मुळीक, स्वप्निल गलघर परिश्रम घेत आहेत.

## शिक्षक दिना पासून विद्यार्थ्यांच्या गणवेश बूट,सॉक्ससाठी गटशिक्षणाधिकारी कार्यालयासमोर कास्ट्राईबचे बेमुदत धरणे आंदोलन

**माजलगाव । प्रतिनिधी**

दरवर्षी शैक्षणिक सत्र सुरू होताना किंवा स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वी जिल्हा परिषद शाळेतील मुला-मुलींना गणवेश व बूट सॉक्स वितरण केले जाते परंतु यावर्षी ते अद्याप पावतो वितरित करण्यात आले नाहीत.तेव्हा ते ०५ सप्टेंबर शिक्षक दिनापूर्वी तालुक्यातील सर्व जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना ते मिळावेत अन्यथा आपल्या कार्यालयासमोर बेमुदत धरणे आंदोलन करण्यात येतील या आशयाचे निवेदन मा. गटशिक्षणाधिकारी यांना कास्ट्राइब महासंघाच्या वतीने देण्यात आल्याचे महासंघाचे ता. अध्यक्ष राहुल टाकणखार यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.

निवेदनात पुढे म्हटले आहे की, गावस्तरावर स्थापन झालेल्या इंग्लिश स्कूल शाळांमध्ये मात्र विद्यार्थ्यांना या सुविधा त्या प्रशासनातील लोकांनी उपलब्ध करून दिलेल्या आहेत. त्यामुळे जिल्हा परिषद शाळांमध्ये जे गोरगरीब-वंचितांचे विद्यार्थी

..... (उर्वरित पान २ वर)

## आर्थिक शिस्त लावून बँक सक्षम करणार- डॉ.आदित्य सारडा द्वारकादास मंत्री नागरी सहकारी बँकेची 62 वी सर्वसाधारण सभा उत्साहात

**बीड । प्रतिनिधी**

सभासदांच्या सहकाऱ्याने, ग्राहक व हितचिंतकांच्या विश्वासाने द्वारकादास मंत्री नागरी सहकारी बँक देशातील एकमेव बँक आहे जी भारतीय रिझर्व्ह बँकेने बँकिंग नियमन कायद्याचे कलम ३५ (अ) नुसार बँकेच्या व्यवहारावर लावलेले आर्थिक निर्बंध उठवणारी. त्यामुळे आपल्या बँकेचे सर्व प्रकारचे आर्थिक व्यवहार पूर्ववत सुरु झाले. दुसरी महत्वाची बाबा म्हणजे आपली बँक निर्बंध मुक्त झाल्याबाबत केंद्र शासनाच्या सहकार मंत्रालयाने सहकारी बँकेची समस्या जाणून घेण्यासाठी शासनाला सल्ला देण्यासाठी



**मंत्री बँकेचे नेट एनपीए शुन्य टक्के वर द्वारकादास मंत्री नागरी सहकारी बँकेने चालू वर्षात मार्च २०२४ पर्यंत कर्जदाराकडून कडक कार्यवाही करून सक्तीची वसुली केल्यामुळे बँकेचा नेट छ्झ शुन्य टक्के झाला आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेने बँकिंग नियमन कायद्याचे कलम लाऊन बँकेच्या व्यवहारावर लावलेले आर्थिक निर्बंध उठवून वर्षभरात बँकेने केलेल्या दर्जेदार कामगिरीमुळे बँकेला ह्या वर्षी ऑडिटमध्ये अ वर्ग मिळाला आहे.**

आणि सहकारी बँकिंग क्षेत्राच्या परिवर्तनासाठी नियुक्त केलेल्या पथकाने (टास्क फोर्स) ने दखल घेतली. बँकेवर निर्बंध लागल्यापासून निर्बंध उठवण्यापर्यंत बँकेने केलेल्या कामाचा आढावा हे पथक घेणार आहे. जेणे करून भारतातील ज्या सहकारी बँकेवर रिझर्व्ह बँकेने निर्बंध लावलेले आहेत त्यांना आपल्या मंत्री बँकेचा आदर्श घेऊन त्या बँका निर्बधमुक्त होण्यासाठी त्यांना मार्गदर्शन करता येईल ही आपल्या मंत्री बँकेसाठी गौरवाची बाब आहे. यापुढे आर्थिक शिस्त लावून बँक सक्षम करण्यावर भर दिला जाईल असे प्रतिपादन बँकेचे अध्यक्ष डॉ.आदित्य सुभाषचंद्र सारडा यांनी केले. ते द्वारकादास मंत्री नागरी सहकारी बँकेची ६२ वी सर्वसाधारण सभा शहरातील बालाजी मंदिर सभागृहामध्ये रविवार १ सप्टेंबर २०२४ रोजी सकाळी १२ ते

....(उर्वरित पान २ वर)

# बीडच्या हजारो तरुणांना नौकरी देण्यासाठी अनिलदादा जगताप यांनी सुपरहायवे तयार केला : अर्जुनराव खोतकर

**▸बीडमधील १३२७ युवक-युवतींना मिळाले नौकरीचे नियुक्तीपत्र**

**बीड । प्रतिनिधी**

राज्याच्या आणि देशाच्या समोर सध्या रोजगाराचा मोठा प्रश्न उभा राहिलेला असताना अनिलदादा जगताप यांनी नौकरी भरती मेळाव्याचे आयोजन करून अत्यंत म हत्वपूर्ण विषयाला हात घातला आहे किंबहुना बीडच्या हजारो तरुणांना नौकरी देण्यासाठी अनिलदादांनी सुपरहायवे तयार केला आहे असं मला याठिकाणी कौतुकाने नमूद करावसं




वाटतं. अनिलदादा तुम्ही लोकांचा आधार बनतायत, युवा वर्गास नौकरीची संधी देऊन प्रत्येक कुटुंबात आनंद पेरतायत याच्यापेक्षा मोठं समाधान कुठलं असू शकत नाही. अनिलदादांनी आताच आपल्या भाषणात माझ्याकडे मागणी की, तुम्ही मुख्यमंत्री युवा कौशल्य विकास योजनेचा बीडला एक महामेळावा द्या, ज्यामुळे माझ्या बीडच्या पन्नास हजार तरुणांना नौकरी मिळेल. दादा मी

**काल रोजी पार पडलेल्या नौकरी भरती मेळाव्यात शिवसेना जिल्हाप्रमुख यांनी कार्यक्रमाचे उदघाटक माजीमंत्री तथा शिवसेना मराठवाडा संपर्क नेते मा. अर्जुनराव खोतकर यांच्याकडे बीडमधील युवा वर्गाच्या व्यथा मांडत मागणी केली की, मुख्यमंत्री युवा कौशल्य विकास योजनेचा बीडला एक महामेळावा द्या, ज्यामुळे माझ्या बीडच्या पन्नास हजार तरुणांना नौकरी मिळेल. याप्रसंगी अनिलदादांच्या यां नि:स्वार्थ मागणीचा विचार करत अर्जुनराव खोतकर यांनी सांगितले की, दादा मी शब्द देतो मी लवकरच मुख्यमंत्री शिंदे साहेबांना यासंदर्भात बोलेल आणि त्यांना बीडमध्ये कौशल्य विकास योजनेचा महामेळावा आयोजित करण्यासाठी सांगेल ज्यातून चांगल्या पगारच्या नौकऱ्या मिळतील. यावरून निश्चितच येणाऱ्या काळात अनिलदादा जगताप यांच्या यां मागणीतून बीडमध्ये मुख्यमंत्री युवा कौशल्य योजनेच्या महाम ेळावा साकार झाल्यास बीडमधील पन्नास हजार तरुणांना नौकरी मिळतील असा अंदाज आहे.**

....(उर्वरित पान २ वर)

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com